(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना " ई-निविदा " कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. " ई-निविदा " कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टांसाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणाऱ्या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहित कार्यपद्धती अनुसरून सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहित प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही. तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकारांचा भंग होणार नाही हे पाहणे.

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरुस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापूर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

(ड) पायाभूत सुविधाअंतर्गतच्या कोणत्याही कामांची दुरुस्ती होणार नाही याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

निधी वितरणविषयक कार्यपद्धती

शासनास सादर करण्यात आलेले परिपूर्ण प्रस्ताव, उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतूद, योजनेचे निकष, कामाचे स्वरूप इत्यादी बाबींचा एकत्रित विचार करून निधीचे वितरण करण्यात येईल. या योजनेअंतर्गत प्राप्त होणारा निधी मुख्याधिकारी व अध्यक्ष यांच्या संयुक्त बँक खात्यावर ठेवण्यात यावा. या निधीचे विनियोग प्रमाणपत्र एक वर्षाच्या कालावधीत सादर करणे बंधनकारक राहील.

६. नगररचना प्रशिक्षण योजना

नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील नगररचना विषयांतर्गत तज्ज्ञ अधिकाऱ्यांची कमतरता दूर करण्यासाठी शासनाने उपरोक्त योजना तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीपासून अस्तित्वात आणली आहे. या योजनेअंतर्गत या विभागातील तांत्रिक अधिकाऱ्यांना नगररचना विषयांतर्गत पदव्युतर पदवी अभ्यासक्रमासाठी अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे/नवी दिल्ली येथे प्रशिक्षणासाठी शासन पुरस्कृत उमेदवार म्हणून पाठविण्यात येते. पूर्वी या योजनेअंतर्गत प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण चार अधिकारी वरील अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात येऊन त्यांचे वेतनावरील खर्च मागणी क्रमांक एफ-२, २२१७, नगरविकास, ८० सर्वसाधारण, ००१, संचालन व प्रशासन ००३ (०१) (०१) अभियांत्रिकी पदवीधरांना नगररचना या विषयातील प्रशिक्षण (२२१७०१८१) लेखाशिर्षातून भागविण्यात येत असे. मात्र आठव्या पंचवार्षिक योजना कालावधीत शासनाने या योजनेचे पुनर्विलोकन करून या योजनेची उपयुक्तता लक्षात घेऊन चार ऐवजी

प्रत्येकी चार प्रमाणे एकूण आठ अधिकारी प्रशिक्षणास पाठविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

७. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान

राज्यातील ड-वर्ग महानगरपालिका व नगरपालिका आणि नगरपंचायती या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान राज्यामध्ये सन २०१० पासून राबविण्यात येत आहे.

सदर अभियानाची अंमलबजावणी आता २१ ऑगस्ट २०१४ रोजी च्या शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत संबंधित शहराचा पाणीपुरवठा, मलनिस्सारण व तद्नंतर रस्ते अन्य पायाभूतविषयक प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत रु. १२८०१ कोटी किंमतीच्या २२४ प्रकल्पांना मंजूरी दिली असून, त्यापैकी १२४ पाणीपुरवठा, ३९ मलनिस्सारण व इतर ६१ पायाभूत सुविधा प्रकल्प आहेत. यापैकी रु. ३८५६ कोटी किमतीचे ६४ प्रकल्प पूर्ण झाले आहेत आणि उर्वरित प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

८. महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णोत्सवी वर्षात दिनांक ३१ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील "ड" महानगरपालिका/नगरपरिषदांमध्ये अग्निशमन सेवांचे सक्षमीकरण करण्यासाठी "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" नावाची योजना सुरू करण्यात आलेली आहे.

९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेंतर्गत राज्यातील नगरपालिकेतील/महानगरपालिकेतील सफाई कामगारांचे विशिष्ट स्वरूपाचे काम विचारात घेऊन ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्ष किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्याच्या पात्र वारसास मालकी तत्त्वावर २६९ चौ. फूट चटई क्षेत्राच्या सदनिका मोफत उपलब्ध करून देण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस अनुदान वितरित करण्यात येते.

महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती यांच्या मालकीच्या जमिनीवर असलेल्या सध्याच्या सेवानिवासस्थानांच्या ठिकाणी, सफाई कर्मचाऱ्यांची सेवानिवासस्थाने तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेच्या निकषानुसार मोफत सदनिका उपलब्ध करून देण्यासाठी ४.०० या कमाल चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांपैकी ५० टक्के सदनिका सेवानिवासस्थाने म्हणून व उर्वरित ५० टक्के सदनिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांना अथवा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र वारसांना मालकी हक्काने मोफत उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

जे सफाई कामगार दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ पूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत अथवा त्यांचा सेवेत असताना मृत्यू झाला आहे अशा सफाई कामगारांचे पात्र वारस सेवेत असतील व त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळेस त्यांची पात्र सेवा २५ वर्षे होत नसेल तर, असे सफाई कर्मचारी ज्यांचे वारस म्हणून सेवेत लागले आहेत त्या सेवानिवृत्त अथवा मृत झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांनी यापूर्वी केलेल्या पात्र सेवेचा कालावधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजने अंतर्गत लाभ देण्यासाठी २५ वर्षांची पात्रता ठरविण्याकरिता विचारात घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. दिनांक २२ ऑक्टोबर २००८ नंतर सेवेत असताना ज्या सफाई कामगारांना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पुढील सेवेसाठी वैद्यकीय कारणास्तव असमर्थ ठरवून रुग्णता सेवानिवृत्त केले आहे, अशा सफाई कामगाराचा पात्र वारस सेवेत असेल व त्या पात्र वारसाच्या सेवानिवृत्तीच्या वेळेस त्यांची पात्र सेवा २५ वर्षे होत नसेल तर रुग्णता सेवानिवृत्त केलेल्या सफाई कर्मचाऱ्यांनी केलेल्या पात्र सेवेचा कालावधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेअंतर्गत लाभ देण्यासाठी २५ वर्षांची पात्रता ठरविण्याकरिता विचारात घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

१०. नवीन स्थापन होणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायती यांच्या विकासासाठी विशेष अर्थसहाय्य करण्याबाबत

दिनांक २७ जून २०१२ च्या शासन निर्णयानुसार, नव्याने स्थापन होणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायतींचा सुनियोजित विकास करता यावा, यासाठी त्यांना स्थापन झाल्यापासून ३ वर्षांपर्यंत पायभूत सुविधा व विविध लोकोपयोगी कामे हाती घेण्यासाठी १०० टक्के शासन अनुदान देण्याचे सन २०१२-१३ पासून निश्चित केले आहे. सदर शासन निर्णय हा निर्गमित झाल्याच्या दिनांकापूर्वी ३ वर्षांच्या कालावधीत स्थापन झालेल्या नगरपरिषदा/नगरपंचायती यांनाही लागू राहील. याकरिता नगरपरिषदा/नगरपंचायतींनी शहरात ज्या बाबींची कमतरता आहे, अशा आवश्यक असलेल्या नागरी सोयी-सुविधांशी संबंधित प्रकल्पांचा समावेश असलेला शहर विकास आराखडा तयार करून संबंधित जिल्हाधिकारी व आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांच्यामार्फत प्रस्ताव शासनास सादर करणे क्रमप्राप्त आहे.

११. महानगरपालिका/नगरपरिषदा यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य करण्याबाबत :

दिनांक २७ जून २०१२ च्या शासन निर्णयानुसार, महानगरपालिका/नगरपरिषदा यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी त्यांची हद्दवाढ झाल्यापासून ३ वर्षांपर्यंत पायाभूत सुविधा व विविध लोकोपयोगी कामे हाती घेण्यासाठी अनुदान देण्याचे सन २०१२-१३ पासून निश्चित केले आहे. या योजनेअंतर्गत हद्दवाढ झालेल्या महानगरपालिकांना प्रकल्प किमतीच्या ८० टक्के व नगरपरिषदांना ९० टक्के याप्रमाणात अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल. सदर शासन निर्णय हा निर्गमित झाल्याच्या दिनांकापूर्वी ३ वर्षांच्या कालावधीत हद्दवाढ झालेल्या महानगरपालिका/नगरपरिषदा यांनाही लागू राहील. याकरिता महानगरपालिका/नगरपरिषदा यांनी हद्दवाढ झालेल्या भागात, ज्या बाबींची कमतरता आहे अशा आवश्यक असलेल्या नागरी सोयी-सुविधांशी संबंधित प्रकल्पांचा समावेश असलेला शहर विकास आराखडा तयार करून आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांच्यामार्फत प्रस्ताव शासनास सादर करणे क्रमप्राप्त आहे.

नागरी आदिवासी वस्ती सुधारणा योजना

राज्यातील नागरी क्षेत्रातील आदिवासी लोकसंख्येच्या कल्याणासाठी "आदिवासी वस्ती सुधारणा योजना" नावाची योजना सन २००६-२००७ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या कामांसाठी १०० टक्के राज्य शासकीय अनुदान अनुज्ञेय आहे. आदिवासी उपयोजनेच्या जिल्हास्तरीय वार्षिक योजनेमधून तरतूद होणे आवश्यक राहील. सदरची योजना राज्यातील केवळ आदिवासी उपयोजना क्षेत्रातील (१) जव्हार नगरपरिषद, जि. ठाणे, (२) डहाणू नगरपरिषद, जि. ठाणे, (३) त्रिंबकेश्वर नगरपरिषद, जि. नाशिक, (४) इगतपूरी नगरपरिषद, जि. नाशिक, (५) नंदूरबार नगरपरिषद, जि. नंदूरबार, (६) तळोदा नगरपरिषद (७) नवापूर नगरपरिषद, जि. नंदूरबार, (८) चिखलदरा नगरपरिषद, जि. अमरावती, (९) पांढरकवडा नगरपरिषद, जि. यवतमाळ, (१०) किनवट नगरपरिषद, जि. नांदेड, (११) शहापूर नगरपंचायत, जि. ठाणे, (१२) कळवण नगरपंचायत, जि. नाशिक, (१३) सुरगणा नगरपंचायत,

जि. नाशिक, (१४) पेठ नगरपंचायत, जि. नाशिक, (१५) धडगाव नगरपंचायत, जि. नंदुरबार, (१६) सिरोंचा नगरपंचायत, जि. गडचिरोली, (१७) अहेरी नगरपंचायत, जि. गडचिरोली, (१८) एट्टापली नगरपंचायत, जि. गडचिरोली, (१९) धानोरा नगरपंचायत, जि. गडचिरोली, (२०) कुरखेडा नगरपंचायत, जि. गडचिरोली, (२१) कोरची नगरपंचायत, जि. गडचिरोली, (२२) भामरागड नगरपंचायत, जि. गडचिरोली, (२३) विक्रमगड नगरपंचायत, जि. पालघर, (२४) तलासरी नगरपंचायत, जि. पालघर, (२५) वाडा नगरपंचायत, जि. पालघर, (२६) मोखाडा नगरपंचायत, जि. पालघर, (२७) धारणी नगरपंचायत, जि. अमरावती, या नगरपरिषदांतील नागरी भागासाठी लागू आहे. या योजनेअंतर्गत आदिवासी वस्त्यांमधील रस्ते, गटारे, सांडपाण्याची व्यवस्था, वीजेची सोय, आरोग्यविषयक सोयी, शिक्षणविषयक सोयी इ. कामे अनुज्ञेय आहेत. या योजनेखालील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. या योजनेकरिता आदिवासी विकास विभागाकडून नगरविकास विभागास तरतूद उपलब्ध करून देण्यात येते.

नागरी क्षेत्रात स्मारके उभारण्याबाबत :

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २१ ऑगस्ट २०१३ अन्वये नगरपरिषद/नगरपालिका/महानगरपालिका कार्यक्षेत्रात स्मारक उभारण्याची कार्यवाही नगरविकास विभागाने करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यास अनुसरून नागरी स्थानिक संस्थेत राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती/स्वातंत्र्य सैनिक/इतिहास प्रसिद्ध व्यक्ती/संत महात्मे/राजकारणातील प्रसिद्ध व्यक्ती यांची स्मारके प्रत्येक जिल्ह्यात खालीलप्रमाणे समिती गठित करावयाचे आहे :—

(१)	जिल्ह्याचे पालकमंत्री	: अध्यक्ष
(२)	जिल्हाधिकारी	: सदस्य
(३)	जिल्हा पोलीस आयुक्त/अधीक्षक	: सदस्य
(४)	जिल्ह्याचे नगररचनाकार	: सदस्य
(५)	अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग.	: सदस्य
(६)	आयुक्त, महानगरपालिका/मुख्याधिकारी, नगरपालिका.	: सदस्य-सचिव

उपरोक्त सदस्यांव्यतिरिक्त अध्यक्षांच्या मान्यतेने अन्य सदस्यांनाही आवश्यकता असल्यास बैठकीस आमंत्रित करता येईल.

२. स्मारकास मान्यता देताना स्मारकाच्या प्रगतीचे टप्पे निश्चित करण्यात यावेत. प्रत्येक टप्प्यासाठी लागणारा निधी निश्चित करण्यात यावा व त्यानुसारच उभारणी होईल याकडे काटेकोरपणे लक्ष द्यावे. स्मारकाची उभारणी जास्तीतजास्त अडीच वर्षांच्या आत पूर्ण करण्यात यावी. स्मारके उभारताना सर्व शासकीय नियमांचे पालन करण्यात यावे. सदर समितीने मंजुरी दिलेल्या स्मारकांबाबतचा सर्वंकष प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनास सादर करावा. स्मारकाकरिता मंजूर करण्यात आलेल्या निधीचे विनियोजन प्रमाणपत्र शासनास विहित कालावधीत सादर करावे. सदर स्मारकाच्या देखभालीची जबाबदारी संबंधित महानगरपालिका/नगरपालिकेची राहील. याकरिता शासनाकडून कोणत्याही प्रकारे निधी उपलब्ध करण्यात येणार नाही.

केवळ महिलांकरिता तेजस्विनी बस सेवा :

राज्यातील २७ महानगरपालिका क्षेत्रात औद्योगिकीकरण व जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर महिला नोकरदार व व्यावसायिकांचे प्रमाण वाढत आहे. त्यांच्या सोईसाठी उत्तम दर्जाची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असणे आवश्यक आहे. महिलांना सुखकर व सुरक्षित प्रवास सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महिलांकरिता स्वतंत्र बस व्यवस्था "तेजस्विनी बस" या नावाने सुरू करण्याचा निर्णय दिनांक ३ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयान्वये खालील अटी शर्तींच्या अधीन घेतला आहे.

१. राज्यातील २७ महानगरपालिकांपैकी मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पुणे व नागपूर या सहा महानगरपालिका क्षेत्रात केवळ महिलांसाठी स्वतंत्र बस सेवा "तेजस्विनी बस" योजना या नावाने प्रथम टप्प्यात कार्यान्वित करण्यात येत आहे.

२. "तेजस्विनी बस" योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या बसेसमध्ये सकाळी ७ ते ११ व सायंकाळी ५ ते रात्रौ ९ या कालावधीकरिता संबंधित बसेसमध्ये महिलांसाठी १०० टक्के आसने राखीव राहतील. या व्यतिरिक्त उर्वरित काळात नियमित आसन व्यवस्थेनुसार बसेस चालविण्याची मुभा महानगरपालिकेस राहील. तथापि, स्थानिक परिस्थितीनुसार यामध्ये बदल करण्याची मुभा योजना अंमलबजावणी समितीस राहील.

३. महिलांकरिता १०० टक्के आसने आरक्षित केलेल्या सकाळी ७ ते ११ व सायंकाळी ५ ते रात्रौ ९ या कालावधीकरिता संबंधित बसेसमध्ये महिला वाहक प्राथम्याने उपलब्ध होईल याची दक्षता महानगरपालिकेने घ्यावी.

४. सदर योजनेतील बसेसचा तिकीट दर संबंधित महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रचलित तिकीट दराइतका राहील.

५. सदर योजनेतील बसेसचा रंग केशरी राहील. तसेच प्रत्येक बसवर "महाराष्ट्र शासन सहाय्यीत-तेजस्विनी बस" असा उल्लेख ठळक मोठ्या अक्षरात करण्यात यावा. त्याचे संकल्पचित्र शासन स्तरावरून निश्चित करून देण्यात येईल.

६. संबंधित महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदरच्या योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता खालीलप्रमाणे अंमलबजावणी समिती गठित करण्यात येत आहे.

महानगरपालिका आयुक्त	:	अध्यक्ष
अपर आयुक्त/उप आयुक्त (परिवहन)	:	सदस्य
प्रमुख वित्त व लेखा अधिकारी	:	सदस्य
महाव्यवस्थापक (परिवहन)	:	सदस्य-सचिव

७. या योजनेअंतर्गत बसेस खरेदीकरण्याकरिता एकवेळचा भांडवली खर्च म्हणून प्रती बस रुपये ३० लक्षपर्यंत १०० टक्के अनुदान शासन महानगरपालिका देईल. सदर निधीमध्ये स्थानिक गरजेनुसार बसचे मॉडेल अंमलबजावणी समितीच्या मान्यतेने महापालिकेने खरेदी करावे. खरेदी ई-निविदा पद्धतीने असावी. मंजूर निधीमधून अंशतः निधी शिल्लक राहिल्यास महानगरपालिका स्वतःच्या स्रोतातून रक्कम भर घालून अतिरिक्त बस खरेदी करू शकेल. मात्र अधिकची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येणार नाही.

(V) कार्यक्रमावरील खर्च (जिल्हास्तर)

(I) विशेष घटक योजना

१. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना.

(१) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना (विशेष घटक योजना)

राज्यातील नागरी क्षेत्रातील विशेष घटक (अनुसूचित जाती व नवबौद्ध) लोकांच्या कल्याणासाठी शासनाने नागरी दलित वस्ती सुधारणा नावाची योजना सन १९९५-९६ पासून सुरू केली आहे. या योजनेचे नाव दिनांक २१ ऑगस्ट २०१९ पासून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना असे करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत नागरी क्षेत्रातील ज्या वस्त्यांमध्ये विशेष घटक लोकसंख्येचे प्रमाण ५० टक्केपेक्षा अधिक आहे तसेच जे प्रभाग विशेष घटकांसाठी राखीव आहेत अशा वस्त्यांमध्ये/प्रभागांमध्ये नागरी सोयी सुविधांविषयक कामे घेण्यासाठी १०० टक्के अनुदान राज्य शासनाकडून देण्यात येते.

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टिकोनातून तसेच शासनाच्या प्रचलित विकेंद्रीकरणाच्या धोरणास अनुसरून सन २००२-२००३ या आर्थिक वर्षापासून या योजनेचे सनियंत्रण जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करून जिल्हास्तरावर देण्याचा शासनाने निर्णय दिनांक ५ मार्च २००२ च्या शासन निर्णयाद्वारे घेतला आहे.

या योजनेअंतर्गत नागरी स्थानिक संस्थांना खालील नमूद किमान मर्यादेपर्यंत अनुदान अनुज्ञेय आहे :—

अ. क्र.	नागरी स्थानिक स्वराज्य संस्था	कमाल अनुज्ञेय अनुदान
१	महानगरपालिका	रु. १००.०० लक्ष
२	" अ " वर्ग नगरपरिषद	रु. ५०.०० लक्ष
३	" ब " व " क " वर्ग नगरपरिषद	रु. २५.०० लक्ष

विशेष घटक योजनेच्या लाभार्थ्यांना अधिकाधिक नागरी सुविधा लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौद्धांसाठी ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध (विशेष घटक) लोकसंख्येच्या आधारावर विशेष घटक योजनेच्या जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत तरतुदी उपलब्ध कराव्यात अशा सूचना सर्व संबंधितांना शासनाने दिल्या आहेत. या योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेली कामे :—

(अ) रस्ते, पोच रस्ते, जोड-रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, सिमेंटीकरण (अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत व रस्त्याकरिता कच्चे रस्ते), नाली बांधकाम, लहान नाल्यावर फरशी बांधणे, विहीर दुरुस्ती तसेच उघड्या विहिरीवर कठडे बांधणे, नदीच्या काठावर अथवा डोंगर उतारावर संरक्षक भिंती; तसेच कठडे बांधणे, छोटे पूल, पिण्याच्या पाण्यासाठी सोईसुविधा, (हापसा, पाण्याची टाकी), सार्वजनिक उपयोगासाठी मुताऱ्या, शौचालये बांधणे, रस्त्यावरील विजेचे दिवे, बालवाडी, बगीचे, बगीच्यांमध्ये पक्क्या स्वरूपाचे बसवावयाचे खेळाचे साहित्य, समाजमंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने, सांस्कृतिक केंद्र, दुकाने, स्मशानभूमीचा विकास यासारखी सार्वजनिक हिताची अन्य कामे हाती घेता येतील.

वरील कामाच्या व्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस स्थानिक गरजेनुसार एखादे काम योजनेंतर्गत हाती घ्यावयाचे असल्यास व ते योजनेच्या अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास असे काम शासनाच्या पूर्वसंमतीने घेता येऊ शकेल.

(ब) या योजनेंतर्गत कामे हाती घेताना " पायाभूत सेवा सुविधांच्या " कामांना प्राधान्य असणे आवश्यक राहील.

(क) शहरांच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार अनुज्ञेय असलेली विकास योजनेंतर्गत कामे या योजनेंतर्गत हाती घेता येतील.

(ड) या योजनेंतर्गत हाती घेतलेल्या कामांची भविष्यातील दुरुस्ती व देखभाल याचा खर्च स्थानिक संस्थेने स्वतःच्या निधीतून करावा. प्राप्त अनुदान कोणत्याही परिस्थितीत देखभाल अथवा दुरुस्तीसाठी वापरू नये.

" लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार " या योजनेसाठी उपलब्ध जिल्हानिहाय तरतुदीचे वितरण प्रत्येक आर्थिक वर्षासाठी स्वतंत्रपणे शासनाकडून सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस करण्यात येईल. शासनाने वितरित केलेल्या जिल्हानिहाय तरतुदी प्राप्त झाल्यानंतर जिल्ह्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीचे वितरण निश्चित करण्यासाठी मा. पालक मंत्री यांचे अध्यक्षतेखाली " जिल्हास्तरीय समिती " नियुक्त करण्यात आली आहे.

(ब) अनिवार्य खर्च

(B) Committed Expenditure

(१) नगरपालिकांना सहायक अनुदान

(२) जमीन महसूल व बिनशेतीसारा अनुदान

(३) मुद्रांक शुल्क अनुदान

(४) गौण खनिज अनुदान

(५) करमणूक कर अनुदान

(६) नवी दिल्ली येथील राष्ट्रीय नागरी कार्य संस्थेस सहायक अनुदान व सदस्यत्व फी

(७) रस्ता अनुदान

(८) नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांच्या वेतनावरील खर्च

(९) १५ वा वित्त आयोग.

(१०) कटक मंडळे अनुदान

(११) यात्रा कर अनुदान

(१२) वस्तू व सेवा कर भरपाई अनुदान.

१. नगरपालिका सहायक अनुदान :

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२००९/प्र.क्र. १०६/०९/नवि-४, दिनांक ३१ ऑगस्ट २००९ अन्वये सन २००९-२०१० या आर्थिक वर्षापासून राज्यातील नगरपरिषद कर्मचाऱ्यांना शासनाकडून देण्यात येणारे जकात अनुदान व महागाई भत्ता अनुदान बंद करून नगरपालिका सहायक अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

शासन निर्णय दिनांक २ ऑगस्ट २०१९ अन्वये राज्यातील नगरपरिषदा/नगरपंचायतीमधील कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणी दिनांक १ जानेवारी २०१६ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. उक्त शासन निर्णयात नमूद केल्यानुसार माहे सप्टेंबर २०१९ पासून ७ वे वेतन आयोगानुसार सहायक अनुदान वितरित करण्यात येत आहे.

२. जमीन महसूल व बिनशेतीसारा अनुदान :

महाराष्ट्र राज्य पहिल्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार (शिफारस क्रमांक १३.८१) ज्या ‘ क ’ वर्ग नगरपरिषदांची लोकसंख्या १५००० पेक्षा कमी आहे अशा नगरपरिषदांना त्यांच्या क्षेत्रात वसूल झालेल्या नागरी संस्थांना जमीन महसूल अनुदान १५% ऐवजी ७५% दराने देण्यात येत आहे.

३. नगरपरिषद क्षेत्रामध्ये असलेल्या स्थावर संपत्तीच्या विवक्षित हस्तांतरणाकरिता मुद्रांक शुल्क बसविण्यासाठी नगरपरिषदांना सहायक अनुदान :

शासन अधिसूचना, नगरविकास विभाग क्रमांक एमसीओ-२४९३/प्र. क्र. ८१/९३/नवि-३२, दिनांक ३० जुलै १९९३ अन्वये राज्यातील सर्व नगरपरिषदांना दिनांक १ ऑगस्ट १९९३ पासून नगरपरिषद क्षेत्रात यावर सविस्तर मालमत्तेचे हस्तांतरणावरील जमा झालेली अर्धा टक्का रक्कम अधिभाराची रक्कम मुद्रांक शुल्क अनुदान म्हणून देण्यात येत होती. पहिल्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सदर अनुदान अर्धा टक्क्यावरून १ टक्का करण्यात आला आहे. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार अनुदान वितरित करण्यात येते.

४. गौण स्वरूपाच्या खनिजावरील स्वामित्व धनासाठी ‘क’ वर्गीय नगरपरिषदांना सहायक अनुदान :

शासन निर्णय, क्रमांक गौखनि-१०९९/प्र. क्र. २०५/ख, दिनांक ११ जुलै, २००० अन्वये राज्यातील ‘ क ’ वर्ग नगरपरिषद क्षेत्रातून वसूल झालेल्या गौण खनिजाच्या स्वामित्व धनाचे संदर्भातील महसुलाबाबत अनुदानाची १ लाखाची मर्यादा रुपये ५ लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे.

५. नगरपरिषदांना करमणूक कर शुल्काच्या अभिहस्तांकित रकमा देणे :

करमणूक करावरील मिळणारे अनुदान सन १९७५-१९७६ पासून सर्व महानगरपालिका व सर्व नगरपरिषदांना त्यांचे हद्दीत मागील वर्षी वसूल झालेल्या करमणूक करापैकी शासन निर्णय क्रमांक एमयूएन-११७५/३०१३५ (१)/एमयूएन-२, दिनांक १ ऑगस्ट, १९७५ पासून खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येते :—

‘अ’ वर्ग नगरपरिषदा	. .	५० टक्के
‘ब’ वर्ग नगरपरिषदा	. .	७० टक्के
‘क’ वर्ग नगरपरिषदा	. .	९० टक्के

६. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय नागरी कार्यसंस्थेस सहायक अनुदान व सदस्यत्व फी :—

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था भारत सरकारचे प्रशिक्षण केंद्र ही संस्था चालविते. कन्व्हेन्सड लोकल गव्हर्नमेंट डिप्लोमा शिक्षणक्रम चालविण्याबद्दल शासनाकडून दरवर्षी रुपये १०,००० शैक्षणिक अनुदान दिले जाते.

७. महाबळेश्वर रस्ता अनुदान :–

नगरपालिकेच्या सीमाबाहेरील विवक्षित रस्त्यांची व पुलांची व्यवस्था ठेवण्यासाठी महाबळेश्वर नगरपालिकेस दरवर्षी रु. १०,००० अनुदान देण्यात येते.

८. नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांच्या वेतनावरील खर्च :–

पहिल्या वित्त आयोगाच्या शिरफारशीनुसार सर्व ‘ क ’ वर्ग नगरपरिषदांना मुख्याधिकाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्च नगरपरिषदांना देण्याचा निर्णय झालेला आहे. तसेच राज्यामधील कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय कार्यालयाकडून त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या रजा राखीव मुख्याधिकाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्च भागविण्यासाठी अनुदान दिले जाते.

९. १५वा वित्त आयोग :

सन २०२०-२१ या वर्षापासून १५वा वित्त आयोग लागु झालेला आहे. १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना Million Plus Cities व Non Million Plus Cities यासाठी स्वतंत्र निधी मंजूर करण्यात येणार आहे. Million Plus Cities अंतर्गत राज्यातील पुढील महानगरपालिका/Urban Agglomeration यांचा समावेश आहे. बृहन्मुंबई (Greater Mumbai Agglomeration), पुणे (Pune Agglomeration) नागपूर (Nagpur Agglomeration) नाशिक (Nashik Agglomeration) औरंगाबाद (Aurangabad Agglomeration) वसई-विरार शहर या नागरी समूहाचा समावेश करण्यात आलेला आहे. इतर सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचा समावेश Non Million Plus Cities गटात करण्यात आलेला आहे. सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीसाठी रु. ११,६११ कोटी इतका निधी चिन्हांकित करण्यात आलेला आहे.

१०. कटक मंडळे अनुदाने :

महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका आणि नोकऱ्यांवरील कर अधिनियम १९७५ (व्यवसाय कर कायदा) च्या कलम २९ नुसार कराच्या नुकसान भरपाई म्हणून राज्यातील पुणे, खडकी, देहू, औरंगाबाद, अहमदनगर व कामटी या कटक मंडळांना अनुदान वितरित करण्यात येते.

११. यात्राकर रद्द केल्यामुळे नगरपरिषदांना नुकसानभरपाई :

शासन निर्णय, नगरविकास व आरोग्य विभाग क्रमांक जीएनटी-१४७७/१८२०/नवि-१०, दिनांक १ जानेवारी १९७८ अन्वये यात्राकर सन १९७७-१९७८ पासून बंद करण्यात आलेला आहे. नगरपरिषदांना सन १९७७-१९७८ पर्यंत ज्या ज्या शहरात येणाऱ्या यात्रेकरूंकडून यात्राकर वसूल करता येत होता, दिनांक १२ मे १९७८ रोजी राज्य शासनाने यात्रा कर वसूल न

करता त्या ऐवजी या नगरपरिषदांनी आधीच्या तीन वर्षांत सरासरी जो यात्रा कर वसूल केला असेल त्याच्या ७५ टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. शासन, नगरविकास विभाग, क्रमांक जीएनटी-३०८७/सीआर ६८/८९/नवि-१६, दिनांक ४ नोव्हेंबर १९८९ अन्वये सन १९८९-९० पासून पूर्वी देण्यात येत असलेल्या अनुदानात तिप्पटीने वाढ करण्यात आली आहे. दिनांक ४ ऑगस्ट २००४ रोजी मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार त्रिंबक, आळंदी, जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर व रामटेक या सहा नगरपरिषदांना पुढीलप्रमाणे अनुदानात वाढ करण्यात आली आहे :—

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव	पूर्वीची रक्कम	वाढीनंतरची रक्कम
१.	त्रिंबक	२,३३,७८८	१०,००,०००
२.	आळंदी	२,०३,७६६	१०,००,०००
३.	जेजुरी	१,७६,२१५	१०,००,०००
४.	पंढरपूर	२५,००,०००	५०,००,०००
५.	तुळजापूर	१,७०,६४६	५०,००,०००
६.	रामटेक	६१,२९९	५,००,०००
	एकूण . .	**३३,३५,७६४**	**१,३५,००,०००**

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक याकअ-१००६/प्र. क्र. ३४/नवि-१६, दिनांक २९ मार्च २००७ अन्वये पंढरपूर नगरपरिषदेस देण्यात येत असलेल्या यात्राकर अनुदानात रुपये ५०,००,००० वरून रुपये १,००,००,००० इतकी वाढ मंजूर करण्यात आली आहे. तसेच नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीईएन-२००७/प्र. क्र. १०९/नवि-१६, दिनांक १७ डिसेंबर २००७ अन्वये पैठण नगरपरिषदेस रुपये १६,५०,००० इतके यात्राकर अनुदान मंजूर झाले आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षापासून शासन निर्णय क्रमांक याकअ-२०११/प्र. क्र. १३८/२०११/नवि-१६, दिनांक ६ जुलै, २०११ अन्वये वरील ७ नगरपरिषदांच्या अनुदानात खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे :—

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव	पूर्वीची रक्कम	वाढीनंतरची रक्कम
१.	त्रिंबक	१०,००,०००	५०,००,०००
२.	आळंदी	१०,००,०००	६५,००,०००
३.	जेजुरी	१०,००,०००	७५,००,०००
४.	पंढरपूर	१,००,००,०००	२,००,००,०००
५.	तुळजापूर	५०,००,०००	१,५०,००,०००
६.	रामटेक	५,००,०००	२५,००,०००
७.	पैठण	१६,५०,०००	५०,००,०००
	एकूण . .	**२,०१,५०,०००**	**६,१५,००,०००**

सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षापासून शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र. क्र. १७४/नवि-१६, दिनांक ३ ऑक्टोबर २०१६ अन्वये वरील ७ नगरपरिषदांच्या अनुदानात खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे :—

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव	यापूर्वी अनुज्ञेय यात्राकर अनुदान रक्कम (रुपये)	सुधारित यात्राकर अनुदान रक्कम (रुपये)
१.	त्रिंबक	५०,००,०००	१,२५,००,०००
२.	आळंदी	६५,००,०००	१,६२,५०,०००
३.	जेजुरी	७५,००,०००	१,८७,५०,०००
४.	पंढरपूर	२,००,००,०००	५,००,००,०००
५.	तुळजापूर	१,५०,००,०००	३,७५,००,०००
६.	रामटेक	२५,००,०००	६२,५०,०००
७.	पैठण	५०,००,०००	१,२५,००,०००
	एकूण . .	**६,१५,००,०००**	**१५,३७,५०,०००**

१२. वस्तू व सेवा कर भरपाई :

केंद्र शासनाने अधिसूचित केल्यानुसार संपूर्ण देशात वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी दिनांक १ जुलै २०१७ पासून सुरू झाली आहे. भारताच्या संविधानाच्या राज्यसूचीच्या सूची-दोन मधील नोंद क्र. ५२ वगळण्यात आल्यामुळे प्रवेश कर, जकात कर, स्थानिक संस्था कर, उपकर बंद करण्यात आले असल्याने स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम, २०१७ प्रसिद्ध करण्यात आला आहे. वस्तू व सेवा कर प्रणाली लागू केल्यामुळे महानगरपालिकांच्या उत्पन्नांमध्ये येणारी तूट भरून काढण्यासाठी शासनाकडून सहायक अनुदान देण्यात येते.

(क) इतर महत्त्वाचे निर्णय व कार्यक्रम—

(१) गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१

(२) अधिनियमातील महत्त्वाच्या सुधारणा

(३) नागरी संस्थांमध्ये दुहेरी लेखा पद्धती

(४) महाराष्ट्र नागरी मूलभूत सुविधा निधी (MUIF)

(५) महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीचे ध्येय.

१. महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ :

अधिनियमात सुधारणा

व्याख्या—अतिक्रमणाखाली जमिन वगळून खाजगी मालकीच्या जमिनीची, तसेच नागरी (कमाल मर्यादा व विनियमन), १९७६ याखालील राज्य शासनाकडे विहिती नसलेल्या अतिरिक्त रिकाम्या जमिनीसह, अशा भूखंडावरील इमारतीसह जमिनीची अनधिकृतपणे पोटविभागणी करून तयार केलेले भूखंड.

पार्श्वभूमी—खाजगी जमिनींची अनधिकृतपणे पोटविभागणी करून भूखंड तयार करणे आणि निवासी गाळ्यांचे बांधकाम करण्याकरिता ते गरजू व्यक्तींकडे हस्तांतरित करणे ही प्रवृत्ती वाढीस लागली होती. जरी गुंठेवारी विकास बेकायदेशीर असला आणि अशा विकासास पायबंद घालणे अत्यंत गरजेच आहे असे असले तरी त्याचवेळी अशा भूखंडावर मोठ्या प्रमाणात असलेली जुनी व दीर्घकालीन अस्तित्त्वात असलेली बांधकामे पाडून टाकणे व्यवहार्य नाही किंवा इष्टही नाही. औपचारिक गृहनिर्माण बाजारपेठ दर्जा व किंमत या दोन्ही बाबतीत समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या निवाऱ्याच्या गरजा पूर्ण करण्यास अपयशी ठरल्यामुळे अशा गोष्टी घडतात. गुंठेवारी विकास हा अनौपचारिक गृहनिर्माणाचा प्रकार असून तो सदोष आणि अपूर्ण असला तरी सामान्य लोकांना त्यांच्या निवाऱ्याच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने पाहिले गेले आणि महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मंजूर होवून दिनांक ३० एप्रिल २००१ पासून अंमलात आणला गेला.

अधिनियमाची व्याप्ती—मुंबई महानगर प्रदेश, अनुसूचित क्षेत्रे, पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील विभाग, गिरीस्थाने, विशेष पर्यटन क्षेत्रे वगळता दिनांक १ जानेवारी २००१ रोजी किंवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेला गुंठेवारी विकास या अधिनियमान्वये नियमितीकरण्यासाठी पात्र असेल.

अधिनियमाची अंमलबजावणी—अधिनियमातील तरतूदीनुसार गुंठेवारी अंतर्गत झालेला विकास नियमित करण्याची कार्यवाही संबंधीत **नियोजन प्राधिकरणे** (महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती) व जिल्हाधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका आयुक्त व नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रात मुख्याधिकारी आणि इतर क्षेत्रात जिल्हाधिकारी यांच्यावर या अधिनियमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी आहे.

अधिनियमात सुधारणा करण्याची आवश्यकता :

(१) सदर अधिनियमाची अंमलबजावणी राज्याच्या काही भागात परिणामकारकरित्या झालेली नाही. बरेच भूखंडधारक या लाभापासून वंचित आहे.

(२) आर्थिक दुर्बल घटक व सामान्य लोकांच्या निवाऱ्याच्या गरजा पूर्ण करणे हा सकारात्मक दृष्टीकोण ठेवून सदर बदल करण्यात आला आहे.

(३) गुंठेवारी नियमितीकरणाअभावी अल्प उत्पन्न व मध्यम उत्पन्न गटातील लोकांना शासकीय योजनांचे लाभ घेण्यावर मर्यादा येत आहेत. त्यामुळे या गटातील लोकांची मागणी विचारात घेता सदर बदल करण्यात आला आहे.

(४) दिनांक १ जानेवारी २००१ नंतरही गुंठेवारी पद्धतीचा विकास झालेला असून सदर विकास हा अधिनियमातील उपरोक्त तरतुदीमुळे नियमानुकूल होऊ शकलेला नाही. त्यामुळे सदर विकास हा अनधिकृत स्वरूपाचा ठरत आहे.

(५) या भूखंडांना सार्वजनिक सुविधा देण्यास नियोजन प्राधिकरणास अडचणी येत असल्याने त्यानुषंगाने गुंठेवारी विकास नियमितीकरणाबाबतचा दिनांक वाढविण्याबाबतची मागणी सातत्याने नियोजन प्राधिकरणांकडून शासनास करण्यात येत होती.

मंत्रिमंडळ निर्णय—उपरोक्त वस्तुस्थिती तसेच नियोजन प्राधिकरणांची विनंती विचारात घेऊन बुधवार, दिनांक ६ जानेवारी २०२१ च्या मा. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मधील कलम ३ (१) व त्याच्या परंतुकामध्ये सुधारणा करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता मिळाली. त्यानुसार गुंठवारी विकास नियमित करणेबाबतचा पायाभूत दिनांक १ जानेवारी २०२१ ऐवजी तो दिनांक ३१ डिसेंबर २०२० अशी सुधारणा करण्यात आलेली आहे.

अधिनियमात सुधारणा—'महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१' अधिनियमातील कलम ३ (१) व त्याच्या परंतुकामध्ये नमूद दिनांकात १ जानेवारी २००१ ऐवजी **दिनांक ३१ डिसेंबर २०२०** अशी सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर सुधारणा **दिनांक १२ मार्च २०२०** पासून अंमलात आलेली आहे.

'महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१' मधील कलम ३ (३) नुसार गुंठेवारी विकास नियमित करताना आकारावयाचे विकास शुल्क आणि प्रशमन शुल्क निश्चित करण्यात आले असून याबाबतचे आदेश **दिनांक १८ ऑक्टोबर २०२१** रोजी शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

२. अधिनियमातील महत्त्वाच्या सुधारणा :

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, यांचा कारभार मुख्यत्वे खालील नमूद केलेल्या अधिनियमांनुसार चालतो.

(१) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८

(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,

(३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

३. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दुहेरी नोंद लेखा पद्धतीची अंमलबजावणी (Double entry system on Accrual Basis) :

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये दुहेरी नोंद लेखा पद्धतीची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने दिनांक ६ जुलै, २००५ रोजी शासन निर्णय काढला असून सर्व महानगरपालिका व "अ" वर्ग नगरपालिकेमध्ये दिनांक १ एप्रिल, २००५ पासून अंमलबजावणी सुरू झाली आहे. तसेच "ब" व "क" वर्ग नगरपालिकांमध्ये सन २००६-०७ पासून अंमलबजावणी सुरू झाली आहे.

या लेखा पद्धतीची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी व समन्वय नियंत्रण ठेवण्यासाठी समन्वय संस्था (Nodal Agency) म्हणून आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांची नियुक्ती केली आहे.

सदर पद्धतीची अंमलबजावणीकरिता तांत्रिक सहाय्य व इतर आवश्यक मदत करण्यासाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयांतर्गत लेखा सुधारणा कक्षाची स्थापना केली आहे.

उपरोक्त शासन निर्णयानुसार विनिर्दिष्ट नियम पुस्तिका तयार करणे नगरपालिका/महानगरपालिका कायद्यात आवश्यक त्या सुधारणा सुचविणे इत्यादीसाठी मा. प्रधान सचिव (नवि) यांचे अध्यक्षतेखाली कर्णधार समिती (Steering Committee) गठीत करण्यात आली असून समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे निश्चित केली आहे :—

(१) राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता मान्य करणे.

(२) दुहेरी नोंद लेखा पद्धतीच्या अंमलबजावणी संदर्भात दुहेरी लेखा कक्षाकडून प्रस्तावित केलेल्या/करण्यात येणाऱ्या सुधारणांबाबत निर्णय घेणे.

(३) राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदांच्या दुहेरी लेखा नोंदपद्धत अंमलबजावणी कामकाजाचा आढावा घेणे.

कार्यक्रमाची ठरविलेली उद्दिष्टे —

* राज्यातील सर्व नगरपरिषदांमध्ये नगरपरिषद स्तरावर नेमण्यात आलेल्या सनदी लेखापालाकडून दुहेरी नोंद लेखा पद्धतीची अंमलबजावणी करणे.

* २७ महानगरपालिकांमध्ये उपार्जित तत्त्वावरील दुहेरी नोंद लेखा पद्धतीच्या अंमलबजावणी कामाचे संनियंत्रण करणे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दुहेरी नोंद लेखा पद्धतीच्या अंमलबजावणीसाठी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार करण्याचे काम नगरपरिषद प्रशासन संचालनालयाअंतर्गत कार्यरत लेखा सुधारणा कक्षातर्फे हाती घेण्यात आले. राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता तयार करण्यासाठी संचालनालयाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक केली. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी राज्य विनिर्दिष्ट लेखा संहितेचे प्रारूप तयार केले व ते कर्णधार समितीने मान्य केले असून दिनांक २३ जानेवारी २०१३ च्या अधिसूचनेनुसार राज्य विनिर्दिष्ट लेखा संहिता प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर लेखासंहिता दिनांक ११ नोव्हेंबर २०१४ पासून लागू करण्यात आली आहे.

४. महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधी (MUIF) :

महाराष्ट्र नागरी लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. परंतु नागरी सुविधांचा विकास मात्र त्याच वेगाने होऊ शकलेला नाही. नागरी भागातील मुलभूत सुविधांच्या विकासासाठी निधीची एकंदर उपलब्धता ही मोठी अडचण नसून बहुतांशी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांतर्फे प्रकल्प तयार करण्याचे आणि वित्तिय संस्था व भांडवली बाजारातून निधी उभा करण्यासाठी लागणारे कौशल्य पुरेशाप्रमाणात उपलब्ध नाही.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जरी अधिक भांडवली गुंतवणूक मिळविण्याची संभाव्य क्षमता असली तरी उत्पन्नात वाढ आणि सुविधा पुरविण्यातील कार्यक्षमता यामध्ये सुधारणा करण्याची त्यांची क्षमता मर्यादित आहे. त्यांच्या अडचणीवर मात करण्यासाठी आणि त्यांच्या भांडवली गुंतवणूक क्षमतेचा विकास करण्यासाठी व प्रोत्साहन देण्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत करणारी कोणतीही यंत्रणा अस्तित्त्वात नव्हती. अशी यंत्रणा उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधी (MUIF) नावाची एक स्वतंत्र संस्था स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

त्यानुसार महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधी (MUIF) मध्ये एक विश्वस्थ निधी (Trust Fund) व महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लि. नावाची एक विश्वस्थ कंपनी (Trustee Company) व महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लि. नावाची एक मत्ता व्यवस्थापन कंपनी (Asset Management Company) यांचा समावेश आहे."

५. महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीचे ध्येय—

सार्वजनिक, खाजगी व सामूहिक क्षेत्रातील सहभागाद्वारे राज्यातील नागरी क्षेत्रात पुरेशा, कार्यक्षेम, परवडण्याजोगा, आधुनिक आणि कायमस्वरूपी अशा नागरी मूलभूत सुविधांच्या विकासासाठी सहाय्य करणे.

महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीची उद्दिष्टे —

(अ) वित्तीय सहाय्यासाठी योग्य अशा प्रकल्पांच्या निर्मितीद्वारे नागरी मूलभूत सुविधांमधील गुंतवणूक वाढविण्यासाठी भांडवली बाजारातून निधी उपलब्ध करण्यास आणि वित्तीय संस्थांकडून प्रत्यक्ष निधी मिळविण्यास सहाय्य करणे.

(आ) योग्य अशा पतवृद्धी उपाययोजनांद्वारे (Credit Enhancement) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्राप्त करावयाच्या भांडवलाचा व्याजदर कमी करण्यास मदत करणे.

(इ) नागरीक हा केंद्रबिंदू मानून नागरी सेवांचा पुरवठा व त्यासाठीचे वित्त सहाय्य यामधील खाजगी व सामूहिक क्षेत्रांच्या सहभागास उत्तेजन देणे.

(ई) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पत क्षमतेमध्ये सुधारणा करणे.

(उ) क्षमतेच्या विकास, प्रात्यक्षिक उपाययोजना आणि धोरणविषयक सुधारणा यांच्याद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांत्मक सुधारणा करणे आणि त्या टिकवून ठेवणे.

अग्निसंरक्षण

Fire Adviser

महाराष्ट्र अग्मिशमन सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई

कार्यक्रम अंदाजपत्रक २०२२-२०२३

आगी लागण्याचे प्रसंग टाळावेत व आग लागल्यावर ती ताबडतोब विझविण्यासाठी व्यवस्था असावी म्हणून प्रत्येक विकसनशील देश अग्निशमन सेवा संघटीत करतो.

२. महाराष्ट्र राज्यात राज्यस्तरीय अग्निशमन सेवा उपलब्ध नाहीत आणि अग्निशमनाचे काम प्रामुख्याने नागरी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती तसेच विशेष नियोजन प्राधिकरणे उदा. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको इत्यादीमार्फत केले जाते. एम.आय.डी.सी. व सिडको यांची स्वतःची अग्निशमन सेवा आहे. राज्यात आता सुमारे १५० पेक्षा जास्त नवीन नगरपरिषदा/नगर पंचायती नव्याने निर्माण करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्रातील ज्या महानगरपालिका/नगरपरिषदा यांचेकडे अग्निशमन सेवा आहेत/नाहीत त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :–

अ. क्र.	स्थानिक स्वराज्य संस्था	एकूण	अग्निशमन सेवा	
			आहेत	नाहीत
१	अ+वर्ग महानगरपालिका	०१	०१	००
२	अ-वर्ग महानगरपालिका	०२	०२	००
३	ब-वर्ग महानगरपालिका	०३	०३	००
४	क-वर्ग महानगरपालिका	०४	०४	००
५	ड-वर्ग महानगरपालिका	१७	१७	००
६	अ-वर्ग नगरपरिषदा	१७	१७	००
७	ब-वर्ग नगरपरिषदा	७३	७१	०२
८	क-वर्ग नगरपरिषदा	१४०	१२६	१४
९	नगरपंचायती	१५१	०७	१४४
	एकूण ..	**४०८**	**२४८**	**१६०**

३. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६, नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात दिनांक ६ डिसेंबर २००८ पासून लागू झाला आहे. तसेच महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९, दिनांक २३ जून २००९ पासून अंमलात आले आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व नियम, २००९ लागू झाल्याने अधिनियम व नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांची नियुक्ती केली आहे.

४. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार कौन्सिलच्या शिफारशीनुसार राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायती यांच्या अग्निशमन सेवेतील त्रुटींचा आढावा या कार्यालयाने घेतला असून त्यानुसार काही महानगरपालिका वगळता सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अग्निशमन सेवेत मोठी तूट आहे. म्हणून ही तूट भरून काढण्यासाठी शासनाने शासन निर्णय, नगरविकास विभाग क्रमांक अशस-१४०७/३६०/प्र.क्र. २११/नवि-२०, दिनांक ३१ ऑगस्ट २००९ नुसार **"महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान"** राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

५. महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत शासन हिस्सा व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांचा हिस्सा याबाबतचा वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यास शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशसे-२०१९/प्र.क्र.६१/नवि-०४, दिनांक १२ मार्च २०२१ च्या शासन निर्णयान्वये शासन मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच नागरी स्वराज्य संस्थांच्या अग्निशमन वाहनांचा ५००० तास ऑपरेशनल वापर झालेला आहे तशी अग्निशमन वाहने विहित पद्धत अवलंबून निकामी करून या अग्निशमन वाहनांच्या बदल्यात नवीन अग्निशमन वाहन खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियांनांतर्गत शासन अनुदान देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीय अनुदान उपलब्ध करून देण्याचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे :—

अ. क्र.	महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायती	शासन अनुदानाची टक्केवारी	महानगरपालिका/ नगरपरिषदांच्या हिश्श्याची टक्केवारी
१	महानगरपालिका-ड वर्ग	७०%	३०%
२	नगरपरिषदा-अ वर्ग	८०%	२०%
३	नगरपरिषदा-ब वर्ग	९०%	१०%
४	नगरपरिषदा-क वर्ग	९०%	१०%
५	नगरपंचायती	९०%	१०%

६. ज्या "ड" वर्ग महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतींकडून परिपूर्ण सविस्तर प्रकल्प प्राप्त होऊन मंजूर झाले आहेत अशा महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती व प्रशिक्षण अकादमीसाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानामध्ये सन २०१०-२०११, २०११-२०१२, २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५, २०१५-२०१६, २०१६-२०१७, २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२० तसेच २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात मंडळनिहाय खालीलप्रमाणे शासन अनुदान वितरित करण्यात आले आहे.

(रुपये लाखात)

अ. क्र.	वर्ष	मराठवाडा विकास मंडळ	विदर्भ विकास मंडळ	उर्वरित महाराष्ट्र मंडळ	एकूण वितरित अनुदान
१	२०१०-११	८६५.६०	१४५४.६५	२०८९.०५	४४०९.३०
२	२०११-१२	६९९.२०	५७३.८०	१०४१.६०	२३१४.६०
३	२०१२-१३	१४४.००	९२.७५	२५२.७५	४८९.५०
४	२०१३-१४	११९.१५	२९३.००	६८२.८०	१०९४.९५
५	२०१४-१५	८२.३५	६६.४०	४८.००	१९६.७५
६	२०१५-१६	००.००	७३.५०	६६.५०	१४०.००
७	२०१६-१७	६४.००	१०६.००	८८.००	२५८.००
८	२०१७-१८	००.००	००.००	६४.००	६४.००
९	२०१८-१९	२५६.००	४७२.५०	३९८.००	११२६.७५
१०	२०१९-२०	००.००	००.००	३२.००	३२.००
११	२०२०-२१	००.००	००.००	००.००	००.००
	एकूण	**२२३०.३०**	**३१३२.६०**	**४७६२.९५**	**१०१२५.८५**

७. सुमारे १५० पेक्षा जास्त नगरपरिषदा/नगरपंचायती नव्याने निर्माण झालेल्या आहेत. शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र. २७/नवि-२०, दिनांक १२ ऑगस्ट २०१६ (प्रत सोबत जोडली आहे) अन्वये राज्यात नव्याने निर्माण झालेल्या/होणाऱ्या "ड" वर्ग महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच नगरपंचायतीमधील अग्निशमन सेवेची तूट भरून काढण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान या योजनेत समावेश करण्यात मंजुरी दिलेली असून त्यांचा समावेश सन २०२२-२०२३ च्या वार्षिक

योजनेमध्ये समावेश केला आहे. शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र. अशसे-२०१९/प्र.क्र. ६१/नवि-०४, दिनांक १२ मार्च २०२१ (प्रत सोबत जोडली आहे) अन्वये महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत अग्निशमन केंद्र बांधणी व अग्निशमन वाहनाच्या खरेदीसाठी अनुज्ञेय खर्चाची सुधारित मर्यादा व सुधारित वित्तीय आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार सदर योजनेमध्ये अनुज्ञेय अनुदानाची रक्कम सुधारित करण्यात आलेली आहे. त्यामुळे ही योजना एकूण रुपये ५६६.६५ कोटीची झाली असून अनुज्ञेय खर्चाची सुधारित मर्यादा व सुधारित वित्तीय आकृतीबंधानुसार शासनाचा हिस्सा एकूण रुपये ४६६.१८ कोटी इतका आहे व "ड" वर्ग महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतींचा एकूण हिस्सा रुपये १००.४७ कोटी इतका आहे. आतापर्यंत अकादमी तसेच एकूण २२३ महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती रुपये १३४.९६ कोटीचे वितरण झालेले असून सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात उर्वरित "ड" वर्ग महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतींकरिता अजून **रुपये ३३१.२२ कोटी** शासन अनुदानाची तरतूद करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

८. या योजनेसाठी सन २०२२-२०२३ साठी मंजूर झालेले शासन अनुदान "ड" वर्ग महानगरपालिका/नगरपरिषदा तसेच नगरपंचायती यांचेकडून प्राप्त होणारे प्रस्ताव शासनास सादर करून शासन मान्यतेने वापरले जाणार आहे. विकास मंडळनिहाय मागणी केलेले अनुदान खालीलप्रमाणे आहे.

(रुपये कोटीत)

अ. क्र.	वर्ष	मराठवाडा विकास मंडळ	विदर्भ विकास मंडळ	उर्वरित महाराष्ट्र मंडळ	एकूण मागणी केलेल अनुदान
१	२०२२-२३	४४.८१	९३.२२	१९३.१९	**३३१.२२**

९. विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०९८ येथील राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राच्या जागी **महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी** प्रस्थापित करण्यास शासनाने प्रशासकीय मान्यता देऊन हे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे डिपॉझिट कॉन्ट्रीब्यूशन तत्त्वावर पूर्ण केले असून ही अकादमी कार्यान्वित झालेली आहे.

१०. आपत्कालीन व्यवस्थापनात अग्निशमन सेवा हा महत्त्वाचा व अविभाज्य भाग आहे. नैसर्गिक आपत्ती, रासायनिक आगी, उंच इमारतीच्या आगी, रेल्वे दुर्घटना, विमान अपघात अशाप्रकारच्या दुर्घटनेत अग्मिशमन व विमोचनाचे कार्य कसे करावे याबाबत कॉम्प्रेस्ड एअर ब्रिथिंग ॲपरेट्स व ट्रेनिंग गॅलरी, यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे तसेच अशाप्रकारच्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रगत आंतरराष्ट्रीय शहरातील अग्निशमन अकादमीच्या धर्तीवर हॉट फायर ड्रिल, सिम्युलेटर, रेस्क्यू ऑपरेशन इत्यादी सुविधांचे प्रशिक्षण देणे ही काळाची गरज आहे. तथापि, अशाप्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी पालघर जिल्हा क्षेत्रामध्ये सुमारे १२.५० एकर जागा उपलब्ध होत आहे. या जागेमध्ये **प्रगत अग्मिशमन अकादमी** प्रस्थापित करण्याचे प्रस्तावित असून या कामासाठी या अभियानांतर्गत रुपये ५०.०० कोटीचे नियतव्यय मंजूर झाले आहे. मुंबईच्या जवळपास ५० एकर जागा मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

११. सन २००४ मध्ये संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा गट-अ या पदाची निर्मिती करून दिनांक १ जुलै २००५ पासून या पदावर नियमितपणे नेमणूक करण्यात आली आहे. शासन निर्णय, नगरविकास विभाग क्र. संकिर्ण-२०१६/प्र.क्र. २४४/नवि-२०, दिनांक ३० जुलै २०१६ अन्वये महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी या कार्यालयासाठी अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्या ऐवजी संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. त्यानुसार लेखाशिर्षामध्ये आवश्यक ते बदल करण्यात आलेले आहेत.

१२. अग्निशमन सेवा प्रभावीपणे काम करण्यासाठी हे कार्यालय महानगरपालिका/नगरपालिका यांच्याशी संपर्क ठेवतात. राज्यातील अग्निशमन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर येथे आयोजित होणाऱ्या प्रगत पाठ्यक्रमांसाठी या संचालनालयामार्फत शिफारशी करण्यात येतात. तसेच प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्यदिनानिमित्त मा. राष्ट्रपतींच्या वतीने जाहीर होणारी विविध प्रकारची अग्निशमन सेवा पदके उदा. (१) राष्ट्रपतींचे अग्निशमन सेवा शौर्य पदक (President's Fire Service Medal for Gallantry), (२) अग्निशमन सेवा शौर्य पदक (Fire Service Medal for Gallantry), (३) उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपतींचे अग्निशमन सेवा पदक (President's Fire Service Medal for Distinguished Service) आणि (४) गुणवत्तापूर्ण सेवेसाठी अग्निशमन सेवा पदक (Fire Service Medal for Meritorious Service) या पदकांच्या शिफारशींची छाननी करून त्या शिफारशी राज्य शासनामार्फत केंद्र सरकारचे गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांना पाठविण्यात येतात. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा हे केंद्रीय वित्त आयोग, राज्य शासनाच्या विविध योजना इ. च्या माध्यमातून व अन्य प्रकारे महाराष्ट्रातील अग्निशमन सेवांच्या सक्षमीकरणासाठी प्रस्ताव तयार करून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. राज्यातील नगरपालिकांना अग्निशमन सेवा सुरू करण्यास या संचालनालयातर्फे संपूर्ण तांत्रिक सहाय्य करण्यात येते.

१३. दिनांक १४ एप्रिल १९४४ रोजी झालेल्या मुंबई गोदीतील स्फोटात अग्निशमन सेवेतील ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी आपले प्राण गमाविले त्या धाडसी वीरांचे स्मरण म्हणून व जनतेस अग्निरोधनाचे शिक्षण व आगीपासून होणाऱ्या उपायांची माहिती देण्याच्या हेतूने केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे दरवर्षी दिनांक १४ एप्रिल ते २० एप्रिल या कालावधीत राज्यात अग्निशमन सेवा सप्ताह पाळण्यात येतो. अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांच्या कल्याण निधी व अग्निशमन सेवा सप्ताहाचे उद्घाटन सर्वसाधारणपणे महाराष्ट्राचे राज्यपाल यांना राजभवन येथे अग्निशमन सेवा सप्ताहाचा फ्लॅग प्रदान करून व त्यांचे हस्ते कल्याण निधीसाठी देणगी स्वीकारून केला जातो. हा सप्ताह पाळण्यासाठी महानगरपालिका/नगरपालिका यांच्या अग्निशमन सेवांना मदत करण्याच्या हेतूने अग्निशमनाचे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या सप्ताहाचा एक भाग म्हणून इयत्ता ५वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येते. तसेच अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांच्या विविध फायर ड्रिल स्पर्धा आयोजित केल्या जातात. भित्तीपत्रके, पिन फ्लॅगस, सिनेमा स्लाईडस् याद्वारे अग्निशमनाबाबत जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित केले जातात. दिनांक २० एप्रिल रोजी होणाऱ्या अग्मिशमन सेवा सप्ताहाच्या समारोप समारंभप्रसंगी विविध अग्निशमन व विमोचन प्रात्यक्षिके व अग्निशमन सेवांचे संयुक्त संचलन आयोजित केले जाते. या प्रसंगी प्रमुख अतिथींना मानवंदना देऊन त्यांच्या शुभहस्ते विविध फायर ड्रिल स्पर्धा, चित्रकला/निबंध स्पर्धा यांच्या विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतात.

१४. महाराष्ट्र अग्मिशमन सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी या कार्यालयांसाठी सन २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या योजनेत्तर तरतूदी पुढे दर्शविल्याप्रमाणे आहेत.

(रुपये लाखांत)

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	सन २०२०-२०२१	सन २०२१-२०२२
१	महाराष्ट्र अग्मिशमन सेवा संचालनालय, मुंबई.	५७.८७	६५.४७
२	महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई.	१३४.००	२०६.८३

तक्ता क्रमांक १-अ

महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई व प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र येथे आयोजित झालेले/होणारे विविध प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम दर्शविणारा तक्ता

अ. क्र.	पाठ्यक्रमाचे नाव	वर्ष	पाठ्यक्रमाची क्षमता	पाठ्यक्रमाचा कालावधी	घेतलेल्या पाठ्यक्रमाची संख्या	प्रशिक्षित प्रशिक्षणार्थ्यांची संख्या	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१	प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम (पुरस्कृत उमेदवारांकरिता).	२०२०-२०२१	३०	३ महिने	. .	. .	
		२०२१-२०२२	३०	३ महिने	. .	. .	
		२०२२-२०२३*	३०	३ महिने	०४	१२०	
२	अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम (खाजगी उमेदवारांकरिता).	२०२०-२०२१	३०	६ महिने	०८	२४०	
		२०२१-२०२२	३०	६ महिने			
	प्रादेशिक अग्मिशमन प्रशिक्षण केंद्रांसह.	२०२२-२०२३*	३०	६ महिने	२०	६००	
३	मूलभूत अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम (सुरक्षा कर्मचारी यांचेकरिता).	२०२०-२०२१	३०	१५ कामांचे दिवस.	. .	. .	आस्थापनांच्या मागणीप्रमाणे पाठ्यक्रम आयोजित करण्यात येतात.
		२०२१-२०२२	३०	१५ कामांचे दिवस.	. .	. .	
		२०२२-२०२३*	३०	१५ कामांचे दिवस.	०४	१२०	
४	Basic Fire Prevention, First Aid and Evacuation Course.	२०२०-२०२१	३०	२ कामांचे दिवस.	. .	. .	आस्थापनांच्या मागणीप्रमाणे पाठ्यक्रम आयोजित करण्यात येतात.
		२०२१-२०२२	३०	२ कामांचे दिवस.	. .	. .	
		२०२२-२०२३*	३०	२ कामांचे दिवस.	०४	१२०	
५.	Refresher Training Course to Fireman, Leading Fireman, etc.	२०२०-२०२१	३०	३० कामांचे दिवस.	. .	. .	आस्थापनांच्या मागणीप्रमाणे पाठ्यक्रम आयोजित करण्यात येतात.
		२०२१-२०२२	३०	२ कामांचे दिवस.	. .	. .	
		२०२२-२०२३*	३०	३० कामांचे दिवस	०४	१२०	

***टीप.**—सन २०२२-२०२३* चे आकडे अंदाजित आहेत.

तक्ता क्रमांक १-ब

महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई येथे आयोजित झालेले/होणारे विविध प्रगत अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम दर्शविणारा तक्ता

अ. क्र.	पाठ्यक्रमाचे नाव	वर्ष	पाठ्यक्रमाची क्षमता	पाठ्यक्रमाचा कालावधी (आठवडे)	घेतलेल्या पाठ्यक्रमाची संख्या	प्रशिक्षित प्रशिक्षणार्थ्यांची संख्या	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१.	उप अग्निशमन अधिकारी व अग्मिप्रतिबंधक अधिकारी पाठ्यक्रम	२०२०-२०२१ २०२१-२०२२	४०	५२	०१	४०	
		२०२२-२०२३*	४०	५२	०१	४०	
२.	आग प्रतिबंधक अधिकारी पाठ्यक्रम	२०२०-२०२१	४०	२०	..	..	
		२०२१-२०२२	४०	२०	..	..	
		२०२२-२०२३*	२०	०२	०४	८०	
३.	डिप्लोमा ऑफ स्टेट फायर अॅकॅडमी अॅण्ड नॉमिनेटेड ऑफिसर्स कोर्स (निवासी).	२०२०-२०२१	२०	२६	..	..	
		२०२१-२०२२	२०	२६	..	..	
		२०२२-२०२३*	२०	२६	०१	२०	
४.	ब्रिदींग ऑपरेटस ट्रेनिंग कोर्स-बेसिक (निवासी).	२०२०-२०२१	२०	२	..	..	
		२०२१-२०२२	२०	२	..	..	
		२०२२-२०२३*	३०	२	२	६०	
५.	ब्रिदींग ऑपरेटस ट्रेनिंग कोर्स-अॅडवान्स (निवासी).	२०२०-२०२१	३०	२	..	..	
		२०२१-२०२२	३०	२	..	..	
		२०२२-२०२३*	३०	२	१	३०	
६.	लायसन्स एजंसीस ट्रेनिंग कोर्स (निवासी).	२०२०-२०२१	३०	१	..	..	
		२०२१-२०२२	३०	१	..	..	
		२०२२-२०२३*	१६	१	४	६४	
७.	ट्रेनिंग फॉर ट्रेनर्स कोर्स/अर्बन सर्च अॅण्ड रेस्क्यू कोर्स.	२०२०-२०२१	१६	३	..	..	
		२०२१-२०२२	१६	३	..	..	
		२०२२-२०२३*	३०	३	२	६०	
८.	ट्रेनिंग प्रोग्रॅम फॉर आर्किटेक्ट (निवासी)	२०२०-२०२१	३०	१	..	..	
		२०२१-२०२२	३०	१	..	..	
		२०२२-२०२३*	१६	१	४	६४	
९.	एक्झेक्युटिव्ह डेव्हेलोपमेन्ट प्रोग्रॅम (निवासी)						
	हॉटेल १६	२०२०-२०२१	९६	१	..	..	
	हॉस्पीटल १६	२०२१-२०२२	९६	१	..	..	
	एअर लाईन इंडस्ट्रीज १६	२०२२-२०२३*	९६	१	४	३८४	
	हाय राईज बिल्डिंग १६						
	इंडस्ट्रीज १६						
	मॉल्स १६						
१०.	कॉम्प्युटर ट्रेनिंग फॉर सिनियर फायर ऑफिसर्स.	२०२०-२०२१	१६	१	..	..	
		२०२१-२०२२	१६	१	..	..	
		२०२२-२०२३*	१६	१	३	४८	
११.	सर्च अॅण्ड रेस्क्यू कोर्स	२०२०-२०२१	३०	२	..	..	
		२०२१-२०२२	३०	२	..	..	
		२०२२-२०२३*	३०	२	२	६०	
१२.	सेमिनार फॉर फायर प्रोफेशनल्स	२०२०-२०२१	१००	एक दिवस	..	..	
		२०२१-२०२२	१००	एक दिवस	..	..	
		२०२२-२०२३*	१००	एक दिवस	२	२००	
१३.	लॉचिंग/प्रमोशन ऑफ फायर टेक्नॉलॉजी प्रॉडक्ट.	२०२०-२०२१	५०	एक दिवस	..	..	
		२०२१-२०२२	५०	एक दिवस	..	..	
		२०२२-२०२३*	५०	एक दिवस	६	३००	

***टीप.—** सन २०२२-२०२३* चे आकडे अंदाजित आहेत.

तक्ता क्रमांक २-अ

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई

कर्मचारी वर्गाचा गोषवारा

अ.क्र.	पदनाम	गट	वेतनमान – ७ वा वेतन आयोग		पदांची संख्या		
			वेतन बॅन्ड	स्तर	२०२०-२०२१	२०२१-२०२२	२०२२-२०२३
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(९)
(अ)	**मंजूर पदे—महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई**						
१	संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा	अ	७८८००-२०९२००	एस-२५	१	१	१
२	वरिष्ठ लिपिक	क	२५५००-८११००	एस-८	१	१	१
३	लिपिक-टंकलेखक	क	१९९००-६३२००	एस-६	१	१	१
४	वाहन चालक	क	१९९००-६३२००	एस-६	१	१	१
५	शिपाई	ड	१५०००-४७६००	एस-१	१	१	१
				एकूण (अ) ...	५	५	५
(ब)	**शासन निर्णय : नविवि, दिनांक २६ मार्च २०२१ अन्वये मंजूर केलेली पदे—महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई**						
१	सहायक संचालक	अ	५६१००-१७७५००	एस-२०	..	२	२
२	लेखापाल	क	३८६००-१२२८००	एस-१४	..	१	१
३	अग्निशामक-विमोचक	क	१९९००-६३२००	एस-६	..	१	१
				एकूण (ब) ...	..	४	४
(क)	**शासन निर्णय : नविवि, दिनांक २६ मार्च २०२१ अन्वये मंजूर केलेली पदे—राज्य अग्निशमन सेवा नियंत्रण कक्ष**						
१	सहायक विभागीय अग्मिशमन अधिकारी	ब	४७६००-१५११००	एस-१७	..	४	४
२	अग्निशमन केंद्र अधिकारी	ब	४४९००-१४२४००	एस-१६	..	४	४
३	सहायक अग्निशमन केंद्र अधिकारी	क	४१८००-१३२३००	एस-१५	..	४	४
४	अग्निशामक-विमोचक	क	१९९००-६३२००	एस-६	..	४	४
				एकूण (क) ...	..	१६	१६
(ड)	**शासन निर्णय : नविवि, दिनांक २६ मार्च २०२१ अन्वये मंजूर केलेली पदे—३६ जिल्हा मुख्यालय**						
१	सहायक संचालक	अ	५६१००-१७७५००	एस-२०	..	३६	३६
२	अग्निशमन केंद्र अधिकारी	ब	४४९००-१४२४००	एस-१६	..	३६	३६
				एकूण (ड) ...	..	७२	७२
				एकूण (अ + ब + क + ड) ...	०५	९७	९७

तक्ता क्रमांक २-ब

महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई

कर्मचारी वर्गाचा गोषवारा

अ.क्र.	पदनाम	गट	वेतनमान ७वा वेतन आयोग		पदांची संख्या		
			वेतन बॅन्ड	स्तर	२०२०-२०२१	२०२१-२०२२	२०२२-२०२३
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
(अ)	**मंजूर पदे—महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई**						
१	वरिष्ठ प्रशिक्षक	ब	४४९००-१४२४००	एस-१६	१	१	१
२	अधीक्षक	क	३८६००-१२२८००	एस-१४	१	१	१
३	लेखापाल	क	३८६००-१२२८००	एस-१४	१	१	१
४	लघुलेखक (निम्नश्रेणी)	क	३८६००-१२२८००	एस-१४	१	१	१
५	कनिष्ठ प्रशिक्षक	क	२५५००-८११००	एस-८	१	१	१
६	अग्निशमन प्रणेता	क	२५५००-८११००	एस-८	१	१	१
७	चालक-यंत्रचालक	क	२५५००-८११००	एस-८	१	१	१
८	अग्निशामक	ड	१९९००-६३२००	एस-६	४	४	४
९	शिपाई	ड	१५०००-४७६००	एस-१	१	१	१
१०	रखवालदार	ड	१५०००-४७६००	एस-१	१	१	१
११	सफाई कामगार	ड	१५०००-४७६००	एस-१	१	१	१
				एकूण (अ) ..	**१४**	**१४**	**१४**
(ब)	**शासन निर्णय : नविवि, दिनांक २६ मार्च २०२१ अन्वये मंजूर केलेली पदे—महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई**						
१	सहायक समादेशक अधिकारी	अ	५६१००-१७७५००	एस-२०	..	१	१
२	वरिष्ठ प्रशिक्षक/केंद्र अधिकारी	ब	४४९००-१४२४००	एस-१६	..	२	२
३	ग्रंथपाल	क	२९२००-९२३००	एस-१०	..	१	१
४	उप अग्मिशमन अधिकारी/कनिष्ठ प्रशिक्षक	क	२५५००-८११००	एस-८	..	४	४
५	प्रयोगशाळा सहायक	क	२५५००-८११००	एस-८	..	१	१
६	वरिष्ठ लिपिक	क	२५५००-८११००	एस-८	..	१	१
७	प्रमुख अग्निशामक विमोचक	क	२५५००-८११००	एस-८	..	१	१
८	चालक-यंत्रचालक	क	२५५००-८११००	एस-८	..	१	१
९	वसतीगृह-भांडारपाल	क	१९९००-६३२००	एस-६	..	१	१
१०	लिपिक टंकलेखक	क	१९९००-६३२००	एस-६	..	१	१
११	अग्निशामक-विमोचक	क	१९९००-६३२००	एस-६	..	६	६
				एकूण (ब). ...	**..**	**२०**	**२०**
				एकूण (अ+ब) ...	**१४**	**३४**	**३४**

तक्ता क्रमांक ३-अ

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई

मुख्य लेखाशीर्ष

नगर विकास विभाग, मागणी क्र. एफ-२
मुख्य लेखा शीर्षक, २०७०, इतर प्रशासनिक सेवा,
१०८, आगीपासून संरक्षण व नियंत्रण (००) (०१) संचालन व प्रशासन,
शासनाचे संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, दत्तमत्त (२०७० ०३४३)

(रुपये हजारात)

अ.क्र.	तपशील	प्रत्यक्ष खर्च २०२०-२०२१			मंजूर अनुदान २०२१-२०२२			अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३*		
		योजनेतर	योजनांतर्गत	एकूण	योजनेतर	योजनांतर्गत	एकूण	योजनेतर	योजनांतर्गत	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
१	वेतन (०१)	..	२१४३	२१४३	..	४६६१	४६६१	..	६३००	६३००
२	अतिकालीक भत्ता (०३)	..	०	०	..	३३	३३	..	१५०	१५०
३	दूरध्वनी, वीज व पाणी देयके (०६)	..	३३	३३	..	३५०	३५०	..	१३७५	१३७५
४	कंत्राटी सेवा (१०)	..	०	०	..	६०	६०	..	१२००	१२००
५	देशांतर्गत प्रवास खर्च (११)	..	०	०	..	१९	१९	..	५००	५००
६	विदेश प्रवास खर्च (१२)	..	०	०	..	१	१	..	५००	५००
७	कार्यालयीन खर्च (१३)	..	६७	६७	..	३४१	३४१	..	१७००	१७००
८	संगणक खर्च (१७)	..	०	०	..	१२६	१२६	..	७००	७००
९	पेट्रोल, तेल व वंगण (२४)	..	०	०	..	१३३	१३३	..	७७५	७७५
१०	जाहिरात खर्च (२६)	..	०	०	..	१	१	..	३००	३००
११	व्यावसायिक व विशेष सेवा (२८)	..	०	०	..	१	१	..	७००	७००
१२	सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (३१)	..	०	०	..	१	१	..	८००	८००
१३	इतर खर्च (५०)	..	०	०	..	५०	५०	..	२२००	२२००
१४	मोटार वाहने (५१)	..	०	०	..	१०	१०	..	७००	७००
	एकूण ...	**..**	**२२४३**	**२२४३**	**..**	**५७८७**	**५७८७**	**..**	**१७९००**	**१७९००**

टीप.—सन २०२२-२०२३* चे आकडे अंदाजित आहेत.

तक्ता क्रमांक ३-ब

महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई

मुख्य लेखाशीर्ष

नगरविकास विभाग, मागणी क्र. एफ-२

मुख्य लेखा शीर्षक, २०७०, इतर प्रशासनिक सेवा,

१०८, आगीपासून संरक्षण व नियंत्रण, (००) (०३) प्रशिक्षण,

शासनाच्या महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाच्या प्रशिक्षणार्थ्यांच्या आस्थापनेवरील खर्च दत्तमत्त (२०७० ०५७७)

(रुपये हजारात)

अ.क्र.	तपशील	प्रत्यक्ष खर्च २०२०-२०२१			मंजूर अनुदान २०२१-२०२२			अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३*		
		योजनेतर	योजनांतर्गत	एकूण	योजनेतर	योजनांतर्गत	एकूण	योजनेतर	योजनांतर्गत	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)
१	वेतन (०१)	..	८२४७	८२४७	..	१००००	१००००	..	१२५००	१२५००
२	अतिकालीक भत्ता (०३)	..	०	०	..	८८	८८	..	१६०	१६०
३	दूरध्वनी, वीज व पाणी देयके (०६)	..	१५६	१५६	..	११००	११००	..	४८००	४८००
४	कंत्राटी सेवा (१०)	..	०	०	..	१३२	१३२	..	५०००	५०००
५	देशांतर्गत प्रवास खर्च (११)	..	०	०	..	३७	३७	..	१२००	१२००
६	विदेश प्रवास खर्च (१२)	..	०	०	..	१	१	..	१५००	१५००
७	कार्यालयीन खर्च (१३)	..	०	०	..	११०९	११०९	..	५८००	५८००
८	भाडेपट्टी व कर (१४)	..	४	४	..	१७६	१७६	..	६०००	६०००
९	संगणक खर्च (१७)	..	०	०	..	१०	१०	..	१२००	१२००
१०	पेट्रोल, तेल व वंगण (२४)	..	०	०	..	३२८	३२८	..	१७००	१७००
११	जाहिरात खर्च (२६)	..	०	०	..	१	१	..	५००	५००
१२	व्यावसायिक व विशेष सेवा (२८)	..	१७	१७	..	२५	२५	..	१२००	१२००
१३	मोटार वाहने (५१)	..	०	०	..	७५	७५	..	२१००	२१००
१४	यंत्र सामुग्री व साधन सामुग्री (५२)	..	०	०	..	३१८	३१८	..	५०००	५०००
	एकूण. .	**..**	**८४२४**	**८४२४**	**..**	**१३४००**	**१३४००**	**..**	**४८६६०**	**४८६६०**

टीप.—सन २०२२-२०२३* चे आकडे अंदाजित आहेत.

नगरपालिका प्रशासन

Municipal Administration

प्रस्ताविक

नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे नगरविकास विभागाच्या अधिपत्याखालील राज्यस्तरीय कार्यालय आहे. राज्यातील नगरपरिषदांच्या नियंत्रणासाठी स्वतंत्र संचालनालयाची गरज विचारात घेऊन या संचालनालयासाठी स्वतंत्र संचालकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. संचालक पदावर भारतीय प्रशासन सेवेतील सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती दिनांक ७ डिसेंबर १९९३ पासून करण्यात येते. दिनांक ७ डिसेंबर १९९३ पूर्वी सचिव, नगरविकास विभाग हेच पद्सिद्ध संचालक होते.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये महाराष्ट्रातील नगरपरिषदांचे कामकाज नियंत्रित केले जात आहे. कलम ४ अन्वये प्रत्येक नगरपरिषदेच्या क्षेत्रांचे त्यांच्या लोकसंख्येच्या आधारे खालीलप्रमाणे **''अ''**, **''ब''** व **''क''** वर्ग असे वर्गीकरण केलेले आहे :—

(अ) १,००,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेले अधिक लहान नागरी क्षेत्र हे **''अ''** वर्ग अधिक लहान नागरी क्षेत्र असेल.

(ब) ४०,००० पेक्षा अधिक असेल परंतु, १,००,००० पेक्षा अधिक नसेल इतकी लोकसंख्या असलेले अधिक लहान नागरी क्षेत्र हे **''ब''** वर्ग अधिक लहान नागरी क्षेत्र असेल.

(क) ४०,००० इतकी किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेले अधिक लहान नागरी क्षेत्र हे **''क''** वर्ग अधिक लहान नागरी क्षेत्र असेल.

(ड) २५,००० इतकी किंवा त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेले क्षेत्र हे **नगरपंचायत** क्षेत्र असेल.

महाराष्ट्रात आज अस्तित्त्वात असलेल्या अ, ब व क वर्ग नगरपरिषदा तसेच नगरपंचायती खालीलप्रमाणे आहेत :—

विभाग	अ-वर्ग	ब-वर्ग	क-वर्ग	नगरपंचायती	एकूण
कोकण	२	५	१५	२१	**४३**
नाशिक	२	१४	२३	१७	**५६**
पुणे	४	११	३६	१५	**६६**
औरंगाबाद	४	१४	३२	२५	**७५**
अमरावती	२	१८	२०	१६	**५६**
नागपूर	३	११	२४	३५	**७३**
एकूण ...	**१७**	**७३**	**१५०**	**१२९**	**३६९**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे राज्यस्तरीय कार्यालय असून या संचालनालयाद्वारे ३६६ नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या कारभारावर नियंत्रण ठेवले जाते. संचालक, नगरपरिषद प्रशासन, नगरपरिषदांना/नगरपंचायतींना मार्गदर्शन करतात. त्याच प्रमाणे नगरपरिषदांच्या वित्त व कार्यप्रणालीची सांख्यिकी माहिती गोळा करून शासनास वेळोवेळी पुरविली जाते.

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या वतीने प्रामुख्याने खालीलप्रमाणे कार्ये पार पाडली जातात :—

- राज्यातील नगरपरिषदांच्या आस्थापनेवरील पदांना मंजुरी देणे.
- राज्यातील नगरपरिषदांच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्ती विहित करणे.
- नगरपरिषदांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
- नगरपरिषदांची प्रशासकीय तपासणी करणे.
- मुख्याधिकाऱ्यांच्या आस्थापनाविषयक कामकाज करणे.
- शासनामार्फत नगरपरिषदांना विविध अनुदाने वितरित करणे.
- नगरपरिषद प्रशासनामध्ये सुधारणा प्रकल्प.
- उदा. वित्तीय व्यवस्थापन सुधारणा, संगणकीकरण, बी.ओ.टी. तत्त्वावरील प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन, नगरोत्थान, अमृत, स्वच्छ भारत अभियान, वैशिष्ट्यपूर्ण, Accrual Based Double Entry Accounting System इत्यादी योजनांची अंमलबजावणी करणे.
- महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियमाखालील कामे.

नगरपरिषदांची तपासणी

राज्यातील नगरपरिषदाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला असता असे दिसून येते की, बहुतांशी नगरपरिषद सध्या आर्थिकदृष्ट्या दुबळ्या अवस्थेत आहेत. त्यापैकी काही नगरपरिषदा तर केवळ कर्मचाऱ्यांच्या पगारावरील खर्च इतकेच उत्पन्न मिळवित आहेत. अशा बिकट आर्थिक अवस्थेमध्ये स्थानिक रहिवाशांच्या अपेक्षेप्रमाणे नगरपरिषदा सेवा पुरविण्यास असमर्थ ठरत आहेत. नागरिकांना पुरवावयाच्या मूलभूत सेवा एक तर पुरविल्या जात नाहीत किंवा जेथे पुरविल्या जात आहेत तेथे त्यांचा दर्जा चांगला नसतो. सेवेचा दर्जा चांगला नाही म्हणून बहुतांश नागरिक या सेवाकरिता वाढीव दराने कर किंवा फी भरण्यास तयार होत नाहीत. कर व फी यांच्यापासून मिळणारे उत्पन्न कमी असल्याने सेवेचा दर्जा सुधारण्याकरिता नगरपरिषदांकडे पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे नगरपरिषदेच्या सेवेचा दर्जा आणखीच खालावत जातो आणि नगरपरिषद सेवेचा दर्जा सुधारण्यामागे यशस्वी होत नाही. नगरपरिषदांना आर्थिक दृष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न होऊन उपाययोजना हाती घेणे अत्यावश्यक झाले आहे.

नगरपरिषदेच्या दैनंदिन कारभारावर प्रशासकीय नियंत्रण ठेवता यावे आणि प्रभावी पर्यवेक्षण करता यावे यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ चे कलम ७४ मधील तरतुदींनुसार जिल्हाधिकारी, प्रादेशिक संचालक, संचालक, नगरपरिषद प्रशासन अशा प्राधिकाऱ्यांची साखळी निर्माण करण्यात आलेली आहे. नगरपरिषदेच्या कारभारांचे आर्थिकदृष्ट्या विश्लेषण व मीमांसा करण्याकरिता पुरेशी उपयुक्त माहिती उपलब्ध करून नगरपरिषदांना वेळीच योग्य मार्गदर्शन करता यावे आणि नगरपरिषदांच्या कारभारामध्ये ज्या अनियमितता घडतात त्यावर प्रभावी नियंत्रण आणणे शक्य व्हावे तसेच बेकायदेशीर व अनियमित होणाऱ्या नेमणुका यामध्ये नगरपरिषदांमध्ये बऱ्याच प्रमाणात खर्चात होत असलेली उधळपट्टी यावर बंधन आणणे शक्य होण्याच्या दृष्टीने नगरपरिषदांचे वार्षिक तपासणी सुधारित नमुने तयार करण्यात आले आहेत. या नमुन्यांमध्ये नगरपरिषदांच्या कारभाराची सखोल व निश्चित माहिती त्यांच्याकडून प्राप्त होणार आहे. त्यामुळे नगरपरिषदांच्या कारभारावर पर्यवेक्षण व नियंत्रण प्रभावी करण्यामध्ये मदत होईल. त्यामुळे नगरपरिषदांना आर्थिकदृष्ट्या सबळ करणे, त्यांच्याकडून पुरविल्या जाणाऱ्या मूलभूत सेवेचा दर्जा सुधारणे, तेथील कर्मचाऱ्यांचे तंत्रज्ञान (कौशल्य) आणि कार्यक्षमतेमध्ये वाढ करणे आणि नगरपरिषदांच्या खर्चात काटकसर करून एकंदरीत कारभारामध्ये शिस्त निर्माण करणे शक्य होणार आहे.

या कामासाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयामध्ये व सहा विभागीय पातळीवरील प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन व नगरपरिषद प्रशासन जिल्हास्तर शाखेसाठी सोबतच्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अधिकारी/कर्मचारी यांची पदे मंजूर असून त्यावरील खर्च व तरतुदींचा तपशील तक्त्यात नमूद केला आहे. (शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक एमसीओ-२०१९/प्र.क्र.१५२/नवि-१४, दिनांक ५-८-२०२० नुसार).

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे बळकटीकरण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१९/प्र.क्र.१५२/नवि-१४,
मंत्रालय, मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक ०५ ऑगस्ट, २०२०.

संदर्भ:- १. नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचा दि.१९.०८.२०१९ चा प्रस्ताव.
२. उच्च स्तरीय सचिव समितीच्या दि.२९.०८.२०१९ च्या बैठकीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना: -

राज्यात अतिशय वेगाने नागरीकरण होत असून, सुमारे ४७ ते ४८% इतकी लोकसंख्या नागरी महाराष्ट्रात वास्तव्य करते. राज्यात सध्या २४० नगरपरिषदा व १२९ नगरपंचायती अशा एकुण ३६९ नागरी स्थानिक संस्था कार्यरत आहेत. नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत या संस्थांचे संनियंत्रण करण्यात येते. राज्यातील वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांची गतीमान सोडवणूक तसेच नागरी भागातील पायाभूत सुविधा प्रकल्पांची गुणात्मक अंमलबजावणी यासाठी सक्षम नगरपरिषद प्रशासन संचालनालयाची आवश्यकता आहे व त्यासाठी संचालनालयाच्या मुख्यालय, विभागीय व जिल्हास्तरावरील आकृतीबंधात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचा एकुण २७४ पदांचा मंजूर आकृतीबंध आहे. संचालनालयाच्या कामाचे स्वरुप व जबाबदारीची व्याप्ती विचारात घेता, आकृतीबंधातील मंजूर पदे अत्यंत अल्प असल्याने, संचालनालयाचा आकृतीबंध सुधारित करण्याच्या प्रस्तावासंदर्भात उच्चस्तर सचिव समिती तसेच, मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या मुख्यालय, विभागीय स्तर व जिल्हास्तरावरील आकृतीबंध खालीलप्रमाणे सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत आहे: -

(१) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या २७४ पदांच्या प्रचलित आकृतीबंधातील १३८ पदे निरसित करुन, खालीलप्रमाणे ५०३ स्थायी पदे व बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाची ४७ पदे सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात येत आहे: -

स्तर	सुधारित आकृतीबंधानुसार प्रस्तावित स्थायी पदे	बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाची पदे
संचालनालय (मुख्यालय)	१०३	०५
विभागीय स्तर (६ विभाग)	१०९	०८
जिल्हा स्तर (३४ जिल्हे)	२९१	३४
	५०३	**४७**
एकूण ५५० पदे (५०३ स्थायी पदे व बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाची ४७ पदे)		

(२) उपरोक्तप्रनाणे सुधारीत आकृतीबंधातील पदांचे स्तर निहाय पदांचे विवरण/ तपशील सोबतच्या परिशिष्ट-अ, ब, क व ड नुसार असेल. सदर परिशिष्टांमध्ये स्तंभ क्र. ६ मध्ये सुधारीत मंजूर पदे दर्शविली आहेत.

(३) जुन्या आकृतीबंधातील निरसित करावयाच्या पदांवर कार्यरत अधिकारी/ कर्मचारी व यांचे मुळ विभागात प्रत्यार्वतन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. नवीन आकृतीबंधातील सहायक पदावरील नियमित नियुक्ती होईपर्यंत निरसित करावयाच्या, लिपिक-टंकलेखक पदावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना सदर पदावर कार्यरत ठेवून, त्यांच्या सेवा टप्प्या-टप्प्याने प्रत्यावर्तीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(४) सुधारित आकृतीबंधानुसार मुख्याधिकारी संवर्ग व नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या सेवा नियमात आवश्यक सुधारणा करण्याची कार्यवाही करण्यास व सदर आकृतीबंधातील सह आयुक्त व उपायुक्त या वरिष्ठ पदावर संचालनालय व मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नतीने नेमण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(५) विहीत मान्यतेनुसार अधिनियमातील तरतूदी विचारात घेऊन, परिशिष्ट-इ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सुधारित पदनामास मान्यता देण्यात येत आहे.

(६) सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने, सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी सादर करावा.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अ.नौ.संदर्भ क्र.१५७/आपुक, दि.३१.०७.२०२० अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००८०५१३५५४४०२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kailas Madhukar Badhan

Digitally signed by Kailas Madhukar Badhan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=22804d8f98c03e9a67ca8eca6a02e7eaab4bcc4a3d59d6ee41c7161eab74b085, serialNumber=e83c1c73de120837488d7637973 4db4b8899e2b35ba1df5cfda9651f0cff78f, cn=Kailas Madhukar Badhan
Date: 2020.08.05 14:17:27 +05'30'

(कैलास बधान)

शासनाचे उप सचिव

प्रतः –

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री(वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री(नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग/ सामान्य प्रशासन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१०. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व)
११. जिल्हाधिकारी (सर्व)
१२. सह / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रादेशिक उप संचालक, नगरपरिषद प्रशासन विभाग (सर्व)
१४. जिल्हा प्रशासन अधिकारी (सर्व)
१५. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायती)
१६. निवडनस्ती (नवि-१४)

परिशिष्ट अ

नगरपरिषद प्रशासन संचालनालय (मुख्यालय)

अ. क्र.	पदनाम	पदांची वेतनश्रेणी	सद्य:स्थितीतील मंजूर पदे	निरसीत पदे	सुधारित आकृतीबंधानुसारची मंजूर पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
		रुपये			
१	आयुक्त तथा संचालक ..	केडर पद	१	०	१
२	सह आयुक्त (सह संचालक) ..	S-२५ रु. ७८८००-२०९२००	१	०	३
३	उपायुक्त (उप संचालक) ..	S-२३ रु. ६७७००-२०८७००	३	०	९
४	सहायक आयुक्त गट-अ (सहायक संचालक गट-अ) ..	S-२० रु. ५६१००-१७७५००	६	०	६
५	सहायक आयुक्त, गट-ब (सहायक संचालक गट-ब, जि.प्र.अ., गट-ब व इतर पदे). ..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	९	०	९
६	सहायक आयुक्त (विधि) श्रेणी-१ ..	S-२० रु. ५६१००-१७७५००	०	०	१
७	सहायक विधि अधिकारी ..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	०	०	२
८	अधीक्षक, गट-ब (अराजपत्रित) ..	S-१४ रु. ३८६००-१२२८००	९	०	१२
९	सहायक ..	(S-८ रु. २५५००-८११००)	१६	०	२९
१०	सांख्यिकी अधिकारी ..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	०	०	१
११	सांख्यिकी सहायक ..	S-८ रु. २५५००-८११००	१	०	१
१२	लिपिक टंकलेखक ..	S-६ रु. १९९००-६३२००	१२	१२	०
१३	लेखा लिपिक ..	S-६ रु. १९९००-६३२००	१	१	०
१४	लघुलेखक (निम्न श्रेणी) (लघुलेखक) ..	S-१४ रु. ३८६००-१२२८००	३	०	४
१५	लघु-टंकलेखक ..	S-८ रु. २५५००-८११००	१	०	१
१६	मुख्य अभियंता (स्थापत्य) ..	S-२९ रु. १३११००-२१६६००	०	०	१
१७	अधीक्षक अभियंता (स्थापत्य) ..	S-२५ रु. ७८८००-२०९२००	०	०	१
१८	कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (कार्यकार अभियंता बांधकाम/पाणीपुरवठा). ..	S-२३ रु. ६७७००-२०८७००	२	०	२
१९	कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) ..	S-२३ रु. ६७७००-२०८७००	०	०	१
२०	उप अभियंता (स्थापत्य) [उप अभियंता (रस्ते विकास/ पाणीपुरवठा)]. ..	S-२० रु. ५६१००-१७७५००	२	०	२
२१	उप अभियंता (यांत्रिकी) ..	S-२० रु. ५६१००-१७७५००	०	०	१
२२	स्थापत्य अभियंता, श्रेणी-अ [कनिष्ठ अभियंता (बांधकाम/पाणीपुरवठा)]. ..	S-१४ रु.३८६००-१२२८००	२	०	२
२३	पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता, श्रेणी-अ	S-१५ रु. ४१८००-१३२३००	०	०	१
२४	संगणक अभियंता, श्रेणी-अ (संगणक अभियंता) ..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	१	०	२
२५	उपायुक्त (वित्त) (वित्तीय सल्लगार) ..	S-२५ रु. ७८८००-२०९२००	१	०	१
२६	वित्तीय नियंत्रक ..	S-२३ रु. ६७७००-२०८७००	१	१	०
२७	सहायक आयुक्त (लेखा) (सहायक संचालक, लेखापरिक्षक)	S-२० रु. ५६१००-१७७५००	१	०	२
२८	लेखापाल/लेखापरिक्षक, श्रेणी-अ (लेखाधिकारी) ..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	१	०	३
२९	वाहन चालक ..	S-६ रु. १९९००-६३२००	१	०	१
३०	दप्तरी ..	S-३ रु. १६६००-५२४००	१	०	१
३१	नाईक ..	S-३ रु. १६६००-५२४००	१	०	१
३२	शिपाई ..	S-१ रु. १५००-४७६००	८	६	२
		एकूण ..	**८५**	**२०**	**१०३**

बाह्य यंत्रणेद्वारे घ्यावयाची पदे

१.	शिपाई	५

परिशिष्ट ब
विभागीय स्तर (६ विभाग)

अ. क्र.	पदनाम		पदांची वेतनश्रेणी	सद्यःस्थितीतील मंजूर पदे	निरसीत पदे	सुधारित आकृतीबंधानुसारची मंजूर पदे
(१)	(२)		(३)	(४)	(५)	(६)
			रुपये			
१	सह आयुक्त	..	S-२५ रु. ७८८००-२०९२००	०	०	६
२	उपायुक्त (उप संचालक)	..	S-२३ रु. ६७७००-२०८७००	६	०	६
३	सहायक आयुक्त, गट-अ (सहायक संचालक गट-अ)	..	S-२० रु. ५६१००-१७७५००	६	०	६
४	तहसीलदार	..	S-१९ रु. ५५१००-१७५१००	४	४	०
५	सहायक आयुक्त, गट-ब (सहायक संचालक गट-ब व इतर पदे).	..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	२४	०	१२
६	सहायक विधि अधिकारी	..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	०	०	६
७	अधीक्षक, गट-ब (अराजपत्रित)	..	S-१४ रु. ३८६००-१२२८००	६	०	१२
८	अव्वल कारकून	..	S-१० रु. २९२००-९२३००	१८	१८	०
९	निरिक्षक	..	S-१० रु. २९२००-९२३००	९	९	०
१०	सहायक	..	(S-८ रु. २५५००-८११००)	०	०	२१
११	लिपिक-टंकलेखक	..	S-६ रु. १९९००-६३२००	१२	१२	०
१२	अधीक्षक अभियंता (स्थापत्य)	..	S-२५ रु. ७८८००-२०९२००	०	०	६
१३	उप अभियंता (स्थापत्य)	..	S-२० रु. ५६१००-१७७५००	०	०	६
१४	उप अभियंता (यांत्रिकी)	..	S-२० रु. ५६१००-१७७५००	०	०	६
१५	स्थापत्य अभियंता, श्रेणी-अ [कनिष्ठ अभियंता (बांधकाम/पाणीपुरवठा)].	..	S-१४ रु. ३८६००-१२२८००	०	०	६
१६	नगर रचनाकार	..	S-२० रु. ५६१००-१७७५००	१	१	०
१७	सहायक आयुक्त (लेखा)	..	S-२० रु. ५६१००-१७७५००	०	०	६
१८	लेखापाल/लेखापरिक्षक, श्रेणी-अ (लेखाधिकारी/ मुख्य लेखापाल, गट-ब/उप लेखापाल, गट-ब).	..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	११	०	६
१९	सहायक लेखाधिकारी	..	S-१४ रु. ३८६००-१२२८००	६	६	०
२०	शिपाई	..	S-१ रु. १५००-४७६००	४	०	४
			एकूण ..	**१०७**	**५०**	**१०९**

बाह्य यंत्रणेद्वारे घ्यावयाची पदे

१. शिपाई ८

परिशिष्ट ‘ क ’

जिल्हा स्तर (३४ जिल्हे)

अ. क्र.	पदनाम		पदांची वेतनश्रेणी	सद्यःस्थितीतील मंजूर पदे	निरसीत पदे	सुधारित आकृतीबंधानुसारची मंजूर पदे
(१)	(२)		(३)	(४)	(५)	(६)
			रुपये			
१	जिल्हा प्रशासन अधिकारी (सह आयुक्त संवर्ग)	..	S-२५ रु. ७८८००-२०९२००	०	०	३४
२	जिल्हा प्रशासन अधिकारी, गट-अ	..	S-२० रु. ५६१००-१७७५००	२०	२०	०
३	जिल्हा प्रशासन अधिकारी, गट-ब (सहायक आयुक्त, गट-ब संवर्ग).	..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	१४	०	३४
४	अधीक्षक, गट-ब (अराजपत्रित)	..	S-१४ रु. ३८६००-१२२८००	०	०	३४
५	सहायक	..	(S-८ रु. २५५००-८११००)	०	०	६८
६	लिपिक-टंकलेखक	..	S-६ रु. १९९००-६३२००	४८	४८	०
७	कार्यकारी अभियंता (स्थापत्य)	..	S-२३ रु. ६७७००-२०८७००	०	०	१९
८	उप अभियंता (स्थापत्य)	..	S-२० रु. ५६१००-१७७५००	०	०	३४
९	स्थापत्य अभियंता, श्रेणी-अ [कनिष्ठ अभियंता (बांधकाम/पाणीपुरवठा)].	..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	०	०	३४
१०	लेखापाल/लेखापरिक्षक, श्रेणी-अ	..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	०	०	३४
			एकूण ..	**८२**	**६८**	**२९१**

बाह्य यंत्रणेद्वारे घ्यावयाची पदे

१. शिपाई ३४

परिशिष्ट ‘ ड ’

नगरपरिषद प्रशासन संचालनालय सुधारित आकृतिबंधातील एकत्रित एकूण पदे

अ. क्र.	पदनाम	पदांची वेतनश्रेणी	सद्यःस्थितीतील मंजूर पदे	निरसीत पदे	सुधारित आकृतीबंधानुसारची मंजूर पदे
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
		रुपये			
१	आयुक्त तथा संचालक ..	केडर पद	१	०	१
२	सह आयुक्त (सह संचालक) ..	S-२५ रु. ७८८००-२०९२००	१	०	४३
३	उपायुक्त (उप संचालक) ..	S-२३ रु. ६७७००-२०८७००	९	०	१५
४	सहायक आयुक्त गट-अ (सहायक संचालक गट-अ, जि.प्र.अ., गट-अ). ..	S-२० रु. ५६१००-१७७५००	३२	२०	१२
५	तहसीलदार ..	S-१९ रु. ५५१००-१७५१००	४	४	०
६	सहायक आयुक्त, गट-ब (सहायक संचालक गट-ब जि.प्र.अ., गट-ब व इतर पदे). ..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	४७	०	५५
७	सहायक आयुक्त (विधि) श्रेणी-१ ..	S-२० रु. ५६१००-१७७५००	०	०	१
८	सहायक विधि अधिकारी ..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	०	०	८
९	अधीक्षक, गट-ब (अराजपत्रित) ..	S-१४ रु. ३८६००-१२२८००	१५	०	५८
१०	अव्वल कारकून ..	S-१० रु. २९२००-९२३००	१८	१८	०
११	निरिक्षक ..	S-१० रु. २९२००-९२३००	९	९	०
१२	सहायक ..	(S-८ रु. २५५००-८११००)	१६	०	११८
१३	सांख्यिकी अधिकारी ..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	०	०	१
१४	सांख्यिकी सहायक ..	S-८ रु. २५५००-८११००	१	०	१
१५	लिपिक-टंकलेखक ..	S-६ रु. १९९००-६३२००	७२	७२	०
१६	लेखा लिपिक ..	S-६ रु. १९९००-६३२००	१	१	०
१७	लघुलेखक (निम्न श्रेणी) (लघुलेखक) ..	S-१४ रु. ३८६००-१२२८००	३	०	४
१८	लघु-टंकलेखक ..	S-८ रु. २५५००-८११००	१	०	१
१९	मुख्य अभियंता (स्थापत्य) ..	S-२९ रु. १३११००-२१६६००	०	०	१
२०	अधीक्षक अभियंता (स्थापत्य) ..	S-२५ रु. ७८८००-२०९२००	०	०	७
२१	कार्यकारी अभियंता (स्थापत्य) [कार्यकारी अभियंता (बांधकाम/पाणीपुरवठा)]. ..	S-२३ रु. ६७७००-२०८७००	२	०	२१
२२	कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) ..	S-२३ रु. ६७७००-२०८७००	०	०	१
२३	उप अभियंता (स्थापत्य) [उप अभियंता (रस्ते विकास/ पाणीपुरवठा)]. ..	S-२० रु. ५६१००-१७७५००	२	०	४२
२४	उप अभियंता (यांत्रिकी) ..	S-२० रु. ५६१००-१७७५००	०	०	७
२५	स्थापत्य अभियंता, श्रेणी-अ [कनिष्ठ अभियंता (बांधकाम/पाणीपुरवठा)]. ..	S-१४ रु.३८६००-१२२८००	२	०	४२
२६	पाणीपुरवठा, जलनिस्सारण व स्वच्छता अभियंता, श्रेणी-अ	S-१५ रु. ४१८००-१३२३००	०	०	१
२७	नगर रचनाकार ..	S-२० रु. ५६१००-१७७५००	१	१	०
२८	संगणक अभियंता, श्रेणी-अ (संगणक अभियंता) ..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	१	०	२
२९	उपायुक्त (वित्त) (वित्तीय सल्लागार) ..	S-२५ रु. ७८८००-२०९२००	१	०	१
३०	वित्तीय नियंत्रक ..	S-२३ रु. ६७७००-२०८७००	१	१	०
३१	सहाय्यक आयुक्त (लेखा) (सहायक संचालक, लेखापरिक्षक)	S-२० रु. ५६१००-१७७५००	१	०	८
३२	लेखापाल/लेखापरिक्षक, श्रेणी-अ (लेखाधिकारी/ मुख्य लेखापाल, गट-ब/उप लेखापाल, गट-ब). ..	S-१५ रु. ४१८००-१३२३००	१२	०	४३

परिशिष्ट-ड --चालू

(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
३३	सहायक लेखाधिकारी	. . S-१४ रु.३८६००-१२२८००	६	६	०
३४	वाहन चालक	. . S-६ रु. १९९००-६३२००	१	०	१
३५	दप्तरी	. . S-३ रु. १६६००-५२४००	१	०	१
३६	नाईक	. . S-३ रु. १६६००-५२४००	१	०	१
३७	शिपाई	. . S-१ रु. १५००-४७६००	१२	६	६
		एकूण . .	**२७४**	**१३८**	**५०३**

बाह्य यंत्रणेद्वारे घ्यावयाची पदे

१.	शिपाई	४७

परिशिष्ट-इ

अ. क्र. (१)	पूर्वीचे पदनाम (२)	सुधारित पदनाम (३)
१.	सह संचालक	सह आयुक्त
२.	उप संचालक	उपायुक्त
३.	सहायक संचालक, गट-अ	सहायक आयुक्त, गट-अ
४.	सहायक संचालक, गट-ब	सहायक आयुक्त, गट-ब
५.	वित्तीय सल्लागार	उपायुक्त (वित्त)

परिशिष्ट ‘ ब ’

राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान आस्थापनेवरील पदांचा गोषवारा (NULM)

अ. क्र. (१)	पदनाम (२)			वेतनमान (३)	पदसंख्या (४)
				रुपये	
१	**राजपत्रित**				
	उप संचालक	..	..	S-२३ (६७७००-२०८७०० ग्रे.पे. ६,६००)	१
	सहायक संचालक	..	..	S-१५ (४१८००-१३२३०० ग्रे.पे. ४,४००)	१
	लेखाधिकारी	..	..	S-१६ (४४९००-१४२४०० ग्रे.पे. ४,६००)	१
				एकूण . .	**३**
२	**अराजपत्रित—वर्ग-२/वर्ग-३**				
	अधीक्षक (अराजपत्रित वर्ग-२)	..	..	S-१४ (३८६००-१२२८०० ग्रे.पे. ४,३००)	२
	सांख्यिकी सहायक	..	..	५,२००—२०,२००/ग्रेड वेतन २,४००	१
	लघुलेखक (निम्नश्रेणी)-मराठी	..	..	S-१४ (३८६००-१२२८०० ग्रे.पे. ४,३००)	१
	लिपिक-टंकलेखक	..	..	S-६ (१९९००-६३२०० ग्रे.पे. १,९००)	२
				एकूण . .	**६**
३	**अराजपत्रित—वर्ग-४**				
	शिपाई	..	..	S-१ (१६६००-५२४०० ग्रे.पे. १३००)	१
				एकूण . .	**१**
				(१)+(२)+(३) = एकंदर . .	**१०**

दुहेरी लेखापद्धतीच्या आस्थापनेवरील पदांचा गोषवारा

अ. क्र. (१)	पदनाम (२)			वेतनमान (३)	पदसंख्या (४)
				रुपये	
१	**राजपत्रित**				
	वित्तीय सल्लागार	..	..	S-२९ (११३११००-२१६६०० ग्रे.पे. ९००)	१
	प्रकल्प समन्वयक अधिकारी	..	..	S-१५ (४१८००-१३२३०० ग्रे.पे. ४,४००)	१
				एकूण . .	**२**
२	**अराजपत्रित—वर्ग ३**				
	सहायक (संगणक लिपिक) ठेका पद्धतीने	..	..	८,००० - प्रतिमाह	१
				एकूण . .	**१**
				(१)+(२)= एकंदर . .	**३**

नगर आणि प्रादेशिक नियोजन
Town and Regional Planning

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
नागरी संशोधन घटक
कार्यक्रम अंदाजपत्रक सन २०२२-२३ बाबत

नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागात उपसंचालक, नगररचना यांचे अधिपत्याखाली सन १९७८ मध्ये नागरी संशोधन घटकाची निर्मिती केली गेली. वाढत्या नागरीकरणामुळे उदभवणाऱ्या गुंतागुंतीच्या समस्या उदा. शहरांची अनिर्बंध वाढ, घर टंचाई, झोपडपट्टीतील वाढ वगैरे बाबतचे दोष टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या नगर नियोजनाच्या विविध विषयांचा तौलानिक अभ्यास नागरी संशोधन घटक करीत आहे. नागरी आणि प्रादेशिक नियोजनाशी निगडीत असलेल्या विविध विषयातील माहिती संकलित करणे हे या घटकाचे प्रमुख काम आहे.

१. प्रशिक्षण

(अ) तांत्रिक अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण -

नगर रचना संचालनालयातील तांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी प्रशिक्षण धोरण राबविण्याबाबत नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३४०७/प्र.क्र.५३७/१३/नवि-१३, दिनांक ८ मे २०१५ नुसार प्रशिक्षण धोरण राबविण्याबाबत शासन निर्णयाद्वारे निर्गत केले आहे, सदर शासन निर्णयानुसार नगर रचना संचालनालयातील रचना सहाय्यक, सहाय्यक नगर रचनाकार, नगर रचनाकार, सहाय्यक संचालक, उपसंचालक व सहसंचालक नगर रचना या पदावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार सन २०१७ व २०१८ मध्ये रचना सहायक ते सहसंचालक नगर रचना या तांत्रिक अधिकाऱ्यांना यशदा, पुणे या संस्थे मार्फत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

(i) नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या रचना सहायक या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण :-

राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शासनाने सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. टीआरएन-०९/प्र.क्र. ३९/०९/१२-अ, दिनांक २३ सप्टेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या 'राज्य प्रशिक्षण धोरण' यास अनुसरून नगररचना संचालनालयातील तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांचे साठीचे प्रशिक्षण धोरण नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१३/३४०७/प्र.क्र. ५३७/१३/नवि-१३, दिनांक ८ मे २०१५ मधील शासन निर्णयान्वये निश्चित करणेत आलेले आहे. त्यानुसार नगररचना संचालनालयामध्ये सरळसेवा भरतीने दाखल होणाऱ्या अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना पायाभूत प्रशिक्षण (Induction Training) हे यशदा, पुणे या शिखर संस्थेमार्फत देणेची तरतूद करणेत आलेली आहे. सध्या संचालनालयामध्ये ३१६ रचना सहायक यांची सरळसेवेने नियुक्तीबाबतची प्रक्रिया पूर्ण झालेली असून या सर्व ३१६ रचना सहायकांना यशदा, पुणे येथे प्रशिक्षण देणेबाबतची कार्यवाही सुरू आहे. सदर प्रशिक्षणाकरीता येणारा खर्च अंदाजित **रुपये ४ कोटी १७ लक्ष फक्त** हा सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षामध्ये यशदा, पुणे यांना अदा करणेत आला आहे. अद्यापपर्यंत २७८ रचना सहायकांनी यशदा, पुणे येथे प्रशिक्षण घेतले आहे. त्यासाठी रुपये ३,६६,९६,००० एवढा खर्च झाला आहे. उर्वरित व प्रतिक्षा यादीतून नियुक्ती मिळालेल्या एकूण ४८ रचना सहायकांचे प्रशिक्षण सन २०२१-२०२२ मध्ये यशदा, पुणे येथे देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(ii) नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या सहायक नगर रचनाकार या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण

संचालनालयामध्ये सहायक नगर रचनाकार यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) मार्फत निवड होऊन नामनिर्देशनाने नियुक्ती करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत. त्यानुसार एकूण १७२ सहायक नगर रचनाकारी राज्यातील विविध कार्यालयांमध्ये रूजू झाले आहेत. त्यांच्या प्रशिक्षणावरील खर्चापोटी रक्कम रुपये २ कोटी २७ लाख एवढी रक्कम "यशदा" या संस्थेस CMP द्वारे दिनांक ३० मार्च २०१९ रोजी रुपये ७५ लाख ८४ हजार व दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ रोजी रुपये १ कोटी ५१ लक्ष याप्रमाणे वर्ग करण्यात आली आहे.

सन २०२१-२०२२ मध्ये दिनांक २० सप्टेंबर २०२१ ते २२ ऑक्टोबर २०२२ या कालावधीमध्ये पहिल्या बॅचचे (३५ प्रशिक्षणार्थी) प्रशिक्षण पूर्ण झाले असून दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ पासून पुढील बॅचच्या प्रशिक्षणचे नियोजन करण्यात आले आहे. त्याप्रमाणे १७२ सहायक नगर रचनाकार यांचे प्रशिक्षण सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ मध्ये पूर्ण करण्यात येईल तसेच प्रतिक्षा यादीतुन रचना सहायक पदावर रूजू झालेल्या एकूण ४८ रचना सहायकांचे प्रशिक्षणही सन २०२१-२०२२ मध्ये पूर्ण करण्यात येणार आहे.

(ब) नगर रचना पदव्युत्तर प्रशिक्षण

नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभागातील अधिकाऱ्यांचे नगर रचना विषयातील ज्ञान व कौशल्य वाढविणेसाठी शासनाने नगर रचना विषयातील उच्च प्रशिक्षणाची योजना तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीपासून अस्तित्वात आणली आहे. या योजनेंतर्गत या विभागातील तांत्रिक अधिकाऱ्यांना नगर रचना विषयांतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे, विश्वेश्वरया राष्ट्रिय प्रौद्योगिकी संस्थान, नागपूर आणि योजना तथा वास्तुकला महाविद्यालय, नवी दिल्ली येथे प्रशिक्षणासाठी शासन पुरस्कृत उमेदवार म्हणून पाठविणेत येते. या योजनेंतर्गत एकूण ४ अधिकारी दर वर्षी वरील तीनही महाविद्यालयात प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्तीवर पाठविणेत येऊन त्यांचे वेतनावरील खर्च मागणी क्र. एफ-२, २२१७-नगरविकास, ८० सर्वसाधारण, ००१-संचालन व प्रशासन ००३ (००) (०१) अभियांत्रिकी पदवीधरांना नगर रचना या विषयातील प्रशिक्षण (२२१७०१८१) या लेखाशिर्षातून भागविण्यात येतो. सन २०२१-२२ मध्ये एकूण ३ अधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठविणेत आलेले आहे. शासन निर्णय क्र. टीपीव्ही. २२०९/१०३१/प्र.क्र. २०९/०९/-नवि-२७, दिनांक ३ फेब्रुवारी २०१० नुसार सहायक नगर रचनाकार या संवर्गातील अधिकाऱ्यांना देखील सेवाजेष्ठतेनुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पुरस्कृत केलेले आहे.

सन २०२१-२०२२ मध्ये एकूण २ अधिकारी यांना पदव्युत्तर प्रशिक्षणाकरीता पाठविण्यात आले असून सन २०२२-२०२३ मध्ये अंदाजे ४ अधिकारी यांना पदव्युत्तर प्रशिक्षणाकरीता पाठविण्याचे प्रस्तावित आहे.

(क) नगर रचना संचालनालयातील अधिकारी/कर्मचारी यांना विहीत संस्थांमार्फत सेवांतर्गत प्रशिक्षण

संचालनालयातील तांत्रिक अधिकारी/कर्मचारी व अतांत्रिक कर्मचारी (लिपिक वर्ग) आणि काही प्रमाणात लेखा शाखेतील कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या प्रशिक्षणासाठी पुरस्कृत केले जाते. अशा प्रशिक्षणामुळे अधिकाऱ्यांना अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर नगर नियोजनामध्ये निश्चितच लाभदायक ठरतो. वेगवेगळ्या संस्थांमार्फत परिसंवाद कार्यशाळा इत्यादीमध्ये सहभाग घेण्यासाठी अधिकाऱ्यांना पुरस्कृत केले जाते. तांत्रिक स्वरुपाच्या कार्याबरोबरच अधिकाऱ्यांना कार्यालय प्रमुखाच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्या दृष्टीने प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय कौशल्य आत्मसात असणे आवश्यक असते. भारतीय लोकप्रशासन संस्था (आय.आय.पी.ए.), नवी दिल्ली यांचेकडील प्रशिक्षणासाठी विभागातील अधिकाऱ्यांना पुरस्कृत केले जाते. याशिवाय विकास योजना आणि त्यांची अंमलबजावणी संदर्भात महाराष्ट्रातील नागरी स्वराज्य संस्थांचा सहभाग असतो. पुणे स्थित यशदा संस्थेकडून काही प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. अन्य राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील शहरांचे नागरीकरण झपाटयाने होत असून एकूण लोकसंख्येच्या तुलनेत सन २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार सुमारे ४५% लोकसंख्या शहरात आहे. त्यामुळे शहरांची अनिर्बंध वाढ होत असून बहुतांशी शहरांना गलिच्छ वस्त्या व झोपडपट्ट्या सारख्या नागरी समस्यांनी ग्रासले आहे. नागरीकरणाच्या समस्या व त्यावर उपाययोजना तसेच नागरीकरणाबाबतच्या, जमिनीच्या मूल्यांकनाबाबत वाहतूक व परिवहन या विषयाबाबत तसेच विविध विषयावर यशवंतराव चव्हाण प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या शिखर संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आयोजित करण्यात येते. त्यासाठी विभागातील व मुख्यालयातील अधिका-यांना व कर्माचा-यांना पुरस्कृत करण्यात येते. सन २०२२-२०२३ मध्येही याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(ड) GIS प्रशिक्षण :-

नगररचना संचालनालयातील तांत्रिक अधिकारी/कर्मचारी व रेखाकला शाखेतील कर्मचाऱ्यांना I.I.R.S., Dehradun येथे G.I.S. विषयक प्रशिक्षण देण्याबाबतचे नियोजन आहे. त्याकरीता अंदाजित रुपये २ कोटी ११ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. अद्याप G.I.S. विषयक प्रशिक्षणावर रुपये १३.५० लक्ष एवढा खर्च झालेला आहे. सन २०१९-२०२० मध्ये एकुण ५९ तांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांनी सदरचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. सन २०२०-२०२१ मध्ये सदर प्रशिक्षण कोविड नियमावलीमुळे घेता आले नाही. उर्वरित तांत्रिक अधिकारी/कर्मचारी यांना भविष्यात I.I.R.S., Dehradun येथे प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यासाठी अंदाजे रुपये १ कोटी ९८ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

(इ) सन २०२२-२०२३ मध्ये नव्याने नियुक्त होणाऱ्या तांत्रिक अधिकाऱ्यांना द्यावयाचे प्रशिक्षण :-

सन २०२२ मध्ये संचालनामार्फत तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत संचालनालयामध्ये पुढीलप्रमाणे तांत्रिक कार्मचारी तसेच अधिकाऱ्यांची सरळ सेवेने भरती करण्याचे प्रयोजन करण्यात आले आहे.

रचना सहायक	-	१०५
सहायक नगर रचनाकार	-	१३८
नगर रचनाकार	-	१८
सहायक संचालक	-	१२
उप संचालक	-	३

उपरोक्त सर्व कर्मचारी/अधिकारी यांची नियुक्ती झाल्यावर त्यांना पायाभूत प्रशिक्षण देण्याचे सन २०२२-२०२३ मध्ये नियोजन करण्यात येणार आहे. त्याकरिता अंदाजे रुपये ४ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

(फ) अतांत्रिक कर्मचारी प्रशिक्षण

१. (लिपिक वर्गीय) -

सन २०२०-२०२१ मध्ये शिपाईपदावरून लिपिक पदावर पदोन्नत झालेल्या २२ कर्मचाऱ्यांना १३ दिवसांचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच पूर्वीच्या प्रशिक्षण सत्रामध्ये अपरिहार्य कारणास्तव अनुपस्थित राहीलेल्या ७ लिपिकवर्गिय कर्मचाऱ्यांना देखील ६ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

२. तांत्रिक प्रकरणे -

शासनाकडून तसेच नगर रचना विभागाच्या विभागीय कार्यालयांकडून प्राप्त विशिष्ठ तांत्रिक प्रकरणांवर तसेच शासनास संचालनालयाचे अभिप्राय सादर करणेविषयी/प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार सर्व सन २०२२-२०२३ मध्येही प्राप्त तांत्रिक प्रकरणावर योग्य ती कार्यवाही नागरी संशोधन घटकामार्फत पूर्ण करण्यात येईल.

३. शासनाकडून अनौपचारिक संदर्भ -

शासनाकडून प्राप्त झालेल्या धोरणात्मक बाबींवरील अनौपचारिक संदर्भाबाबतची कार्यवाही नागरी संशोधन घटकाकडून पार पाडण्यात येते.सन २०२२-२३ मध्येही याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

४. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठका -

संचालनालयाच्या वरिष्ठ अधिका-यांच्या बैठका वेळोवेळी घेण्यात येऊन त्या बैठकीमध्ये आवश्यक ते मार्गदर्शन अधिकाऱ्यांना करण्यात येते. सन २०२२-२०२३ मध्येही नागरी संशोधन घटकामार्फत अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकांचे आयोजन करण्यात येऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात येईल.

५. प्रादेशिक योजना -

संपूर्ण महाराष्ट्र नियोजनबद्ध करण्याचे शासनाचे उद्दीष्ट पूर्ण झाले आहे. सर्वसाधारणपणे राज्यांचे ३०% एवढया क्षेत्राचे जमीन वापराचे नियोजन झालेले नव्हते, ते नियोजन पूर्ण झाले आहे.

सन २०१७-१८ मध्ये १२ जिल्हयांच्या प्रादेशिक योजना (वर्धा, भंडारा, गोंदिया, धुळे, नंदूरबार, परभणी, बीड, हिंगोली, उस्मानाबाद, यवतमाळ, बुलढाणा, ठाणे-पालघर-रायगड) द्रुतगतीने तयार केल्या असून त्या शासनाकडून मंजूर झाल्या आहेत. तसेच सातारा, कोल्हापूर, नांदेड, लातूर व जालना या ५ जिल्ह्यांच्या प्रादेशिक योजना देखील मंजूर झालेल्या आहेत. राज्यातील सर्व जिल्ह्याच्या प्रादेशिक योजना, सद्यःस्थितीत मंजूर आहेत.

सद्यःस्थितीत द्रुतगती प्रादेशिक योजना मधील विकास केंद्र व परिघक्षेत्र नकाशे तयार करण्याचे काम पुर्ण झाले असून प्रादेशिक योजना बीड व ठाणे-पालघर-रायगड वगळून उर्वरित १० प्रादेशिक योजनामधील नकाशे मंजूर करण्यात आले आहेत. एकूण नागरी विकास केंद्र ९० (२४०-समाविष्ट गावे) व एकूण परीघ/झालर क्षेत्र २५ (१४६-समाविष्ट गावे) आहेत.

६. विकास योजना तयार करणे -

महाराष्ट्र राज्यात शासनाने सन २०१५ व २०१६ या कालावधीत विविध शासन निर्णयान्वये नव्याने १६ नगरपरिषदा व १२० नगरपंचायती अशी एकूण १३६ स्थानिक प्राधिकरणे स्थापन केलेली आहेत. तसेच डिसेंबर २०१८ पर्यंत एकूण अस्तित्वातील ६२ नियोजन प्राधिकरणांच्या (७ महानगरपालिका) विकास योजना सुधारित करावयाच्या आहेत.या पार्श्वभूमीवर महानगरपालिका वगळून उर्वरित १३६ + ५५ = १९१ नियोजन प्राधिकरणांचे "G.I.S.-Based Development Plan" २ वर्षांचे कालावधीमध्ये, खाजगी संस्थेच्या सहकार्याने, करण्याचे नियोजन करण्यासाठीची कार्यपद्धती शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस. १८१८/१४८९/प्र.क्र. ३०३/१८/नवि-१३, दिनांक २५ जानेवारी २०१९ अन्वये ठरविण्यात आली आहे. सद्यःस्थितीत एकूण ९९ नगरपरिषदा/नगरपंचायती करिता कार्यादेश देण्यात आले आहेत. या कामाकरिता अंदाजे रुपये ७०.०० कोटी इतका खर्च येत्या पुढील तीन वर्षात अपेक्षित आहे. त्यापैकी २०२१-२२ आर्थिक वर्षात ४०% म्हणजे अंदाजे रुपये २८.०० कोटी, तसेच सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात २०% म्हणजेच अंदाजे रुपये १४ कोटी इतका खर्च होणे अपेक्षित आहे.या कामासाठी शासनाच्या नगर विकास विभाग (नवि-२) यांचेकडून संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे बँक खात्यामध्ये करून देण्याबाबत दिनांक २७ नोव्हेंबर २०१८ रोजी मा. प्रधान सचिव (नवि-१) यांचेकडे आयोजित बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

७. शासन निर्णय व परिपत्रके -

शासनाकडून नगर रचना विषयासंदर्भात प्राप्त होणारी शासनाची परिपत्रके नगर रचना संचालनालयाशी संबंधित सर्व कार्यालयांना पाठविणे विषयाची कार्यवाही नागरी संशोधन घटकामार्फत करण्यात येईल.

८. संचालनालयाचे संगणकीकरण -

संचालनालयाचे संगणकीकरणासाठी प्रकल्प अंमलबजावणी समितीची (P.I.C.) स्थापना मा.प्रधान सचिव (नवि-१) यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आली असून मा.संचालक, नगर रचना सदर समितीचे सदस्य सचिव आहेत. P.I.C. च्या वेळोवेळी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे संचालनालयाचे संगणकीकरणांतर्गतची कामे कार्यवाहीत आहेत. सदर करिता सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अंदाजे ४ कोटी इतका निधी आवश्यक आहे.

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
Town Planning and Valuation Department

कार्यक्रमाच्या कार्यभाराचा सारांश व वित्तीय आवश्यकतांचे स्पष्टीकरणे

नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग हा **सेवा-विभाग** असून त्याची संघटनात्मक बांधणी खालीलप्रमाणे आहे :—

(१) **मुख्य कार्यालय पुणे :- नागरीकरणांसंबधी** सर्वसाधारण धोरणे ठरविण्याचे काम करणे इत्यादी. मुख्य कार्यालयात खालीलप्रमाणे तीन घटक आहेत :-

(अ) **परिनिरीक्षण घटक -** मुख्य कार्यालयात करण्यात येणाऱ्या सर्व तांत्रिक कामांचे परिनिरीक्षण करणे.

(ब) **नागरी संशोधन घटक -** राज्यातील नगरविकास समस्यांचा सखोल अभ्यास करणे, की ज्यामुळे याबाबतीत क्षेत्र कार्यालयांना मार्गदर्शन करणे व भारतीय आणि मुख्यत्वेकरुन महाराष्ट्रातील परिस्थितीला पुरेशी योग्य व नियोजनाप्रमाणे आणि तंत्र शोधून काढता येणे शक्य होईल.

(क) **प्रशासन घटक -** प्रशासन, अर्थसंकल्प आणि लेखा.

(२) **सहसंचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष, पुणे :-** विकास योजनांचे योग्यप्रकारे कार्यान्वय करणे व त्या अंमलात आणणे यासंबंधी नगरपरिषदांना मार्गदर्शन करणे आणि मंजूर विकास योजना व नगररचना योजना अंमलात आणणे व त्यांचे कार्यान्वयन आणि नगरपरिषद, गावांतील खुल्या जागा व क्रीडांगणे यावर सर्वसाधारण लक्ष ठेवणे. विकास योजना आणि लहान व मध्यम शहराचे एकात्मिकृत विकास प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी नगरपरिषदांना द्यावयाच्या आर्थिक सहाय्यासंबंधी वेळोवेळी आढावा घेणे. नवि ६ (ब) योजनेअंतर्गत नगरपरिषदांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासंबंधात कार्यवाही करुन त्यासंदर्भात शिफारस करण्यास सनियंत्रक आहेत.

(३) सहसंचालक, नगररचना (मूल्यांकन), पुणे वार्षिक मुल्यदर तक्ते दरवर्षी तयार करणे. मालमत्तेचे मूल्यांकन करणेसाठी नोंदणी महानिरीक्षक यांना सहाय्य करून शासनाच्या साधनसंपत्तीत वाढ करण्यासाठी सहाय्य करणे.

(४) नवी मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती व औरंगाबाद या ठिकाणी सहसंचालक, नगररचना यांची विभागीय कार्यालये आणि बृहन्मुंबई उप संचालकांचे कार्यालय.	पर्यवेक्षण, नियंत्रण, समन्वय, मार्गदर्शन आणि शाखा कार्यालयाची तपासणी.
(५) मुंबई, अलिबाग, ठाणे, जळगाव, नाशिक, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, सांगली अहमदनगर, नागपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, औरंगाबाद, परभणी,हिंगोली, वाशीम, गोंदिया, नंदूरबार, नांदेड ,पालघर आणि नव्याने अपग्रेड झालेली रत्नागिरी सिंधुदूर्ग, धुळे, चंद्रपूर, गडचिरोली, बुलढाणा, वर्धा, भंडारा, बीड, जालना, लातूर, उस्मानाबाद, या ठिकाणी सहायक संचालक, नगररचना यांची शाखा कार्यालये.	वार्षिक कामाचे प्रमाण- ४,५०० वर्क युनिटस.
(६) बारामती या ठिकाणी नगररचनाकार यांचे कार्यालय.	वार्षिक कामाचे प्रमाण- ३,००० वर्क युनिटस.
(७) उप संचालक, नगररचना प्रादेशिक योजना, डहाणू/ठाणे तसेच सहायक संचालक, नगररचना, प्रादेशिक योजना, रत्नागिरी-सिंधुदूर्ग येथे कार्यालये.	प्रादेशिक योजना तयार करणे.
(८) वाहतूक आणि परिवहन घटक, उप संचालक, नगररचना, पुणे, सहायक संचालक, नगररचना, औरंगाबाद.	महानगरे व इतर शहरे आणि नगरे याकरिता व्यापक स्वरुपाच्या वाहतूक व परिवहन योजना तयार करणे.
(९) लवाद, नगररचना योजना, श्रीरामपूर.	श्रीरामपूर व पनवेल नगरपरिषदांच्या प्रारुप नगररचना योजना अंतिम करणे.
(१०) पिंपरी-चिंचवड, नाशिक या महानगर-पालिकांमध्ये एक उप संचालक.	महानगरपालिकांच्या विकास योजनांचे कार्यान्वयन व त्यांचे क्षेत्रातील विकासाचे बाबतीत महानगरपालिकांना सहाय्य करणे.
(११) ठाणे, कल्याण, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, अमरावती, पुणे, औरंगाबाद, नागपूर आणि नांदेड-वाघाळा, वाशी (नवी मुंबई), उल्हासनगर व भिवंडी-निजामपूर, अहमदनगर या महानगर-पालिकांमध्ये, प्रत्येकी एक सहायक संचालक, नगररचना.	महानगरपालिकांच्या विकास योजनांचे कार्यान्वयन व त्यांचे क्षेत्रातील विकासाचे बाबतीत महानगरपालिकांना सहाय्य करणे.
(१२) उल्हासनगर, सांगली-मिरज-कुपवाडा, अहमदनगर, अकोला, धुळे, मालेगाव, नांदेड-वाघाळा, जळगाव म.न.पा., भिवंडी-निजामपूर, भुसावळ, सातारा, इचलकरंजी, परभणी, बीड, लातूर, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, अचलपूर, यवतमाळ, जालना, या " अ " वर्ग नगरपरिषदांमधील नगररचनाकार.	नगरपरिषदांच्या विकास योजनांचे कार्यान्वयन व त्यांच्या गावातील विकास यावर लक्ष ठेवणे इत्यादी बाबतीत नगरपरिषदांना सहाय्य करणे.
(१३) पिंपरी -चिंचवड-मनपा, औरंगाबाद मनपा क्षेत्र, नागपूर म.न.पा., अकोला म.न.पा., कोल्हापूर म.न.पा. व ठाणे मनपा. साठी उप संचालक, नगररचना (विकास योजना विशेष घटक) यांचे प्रत्येकी एक कार्यालय. सहायक संचालक,नगर रचना, विकास योजना, विशेष घटक,भिवंडी निजामपूर मनपा.	महानगरपालिका क्षेत्रासाठी विकास योजना तयार करणे.

(१४) सहायक संचालक नगर रचना, नगररचना योजना क्र. १ व २ इचलकरंजी.	नगर रचना योजना १ व २ मध्ये फेरबदल करण्याकरिता इचलकंरजी मध्ये विशेष घटक स्थापना.
(१५) सहायक संचालक, राष्ट्रीय माहिती कक्ष, पुणे.	केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी माहिती पद्धती (NUIS) या योजनेसाठी निवडलेल्या शहराच्या माहितीचे संकलन, छाननी व अनुषंगिक कार्यवाही करणे.
(१६) पुणे व नागपूर येथे कार्यकारी अभियंता अंमलबजावणी कक्ष, नगर रचना यांचे प्रत्येकी एक कार्यालय.	विकास योजना आणि लहान व मध्यम शहरांचे एकात्मिक विकास प्रकल्प यांचे कार्यान्वयन.
(१७) वाशिम, पंढरपूर, पनवेल, वाई, सावंतवाडी-मालवण, मालेगाव, कराड, नेरळ- ममदापूर व बीड येथे नगर रचनाकार, विकास योजना, विशेष घटक यांचे प्रत्येकी एक कार्यालय.	" अ " " ब ", वर्ग नगरपरिषदा असलेल्या शहराच्या विकास योजना सुधारित करणे.

(अ) मंजूर प्रादेशिक योजना

(A) SANCTIONED REGIONAL PLANS

मोठी गावे अथवा साधनसंपत्तीने समृद्ध असलेले प्रदेश अथवा विकासयोग्य प्रदेश यांच्या लगतच्या भागांची एकत्मिकृत आणि समन्वित आणि समन्वित वाढण्याचे दृष्टीने त्यांची वाढ, संभाव्य विकास क्षमता व प्रश्न यांची काळजीपूर्वक सर्वेक्षणे व पृथःकरण करुन, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार ' प्रादेशिक योजना ' तयार केल्या जातात. नियोजन प्रदेश शासनाकडून महारष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३ अन्वये अधिसूचित केले जातात आणि प्रादेशिक योजना तयार करण्यासाठी बहुशास्त्रीय प्रादेशिक नियोजन मंडळे स्थापन केली जातात. आजतागायत मंजूर प्रादेशिक योजनेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

परिशिष्ट-१

मंजुर प्रादेशिक योजना.					
अ. क्र.	जिल्हा	प्रदेशाचे नांव	प्रदेशाचे स्वरुप जसे महानगरी, कृषीप्रधान	प्रादेशिक योजना शासनाने मंजुर केल्याची तारीख	प्रादेशिक योजना अंमलात आल्याची तारीख
१	२	३	४	५	६
पुणे विभाग					
१	सातारा	महाबळेश्वर-पाचगणी प्रादेशिक योजना (सुधारित)	पर्यावरणदृष्टया संवेदनशील	०७-०८-२०१५	०३-११-२०१५
		सातारा प्रदेशाची प्रादेशिक योजना	महाबळेश्वर - पांचगणी प्रादेशिक योजना क्षेत्र वगळून उर्वरित सातारा जिल्हयाचे क्षेत्र - कृषीप्रधान	०८-०१-२०१८	०८-०४-२०१८
नागपूर सुधार प्रन्यासकडे प्रशासकीय बाबीसाठी कार्यकारी अधिकारी असतो. त्यांच्या अधिपत्याखाली १ आस्थापना अधिकारी, एक विधी अधिकारी, वर्ग -१ व १ प्रशासकीय अधिकारी वर्ग-२ व शाखा अधिकारी-०४ इत्यादी नासुप्रच्या सर्व संपत्ती व व्यवस्थापनामध्ये कार्यरत आहे. विकास कामासाठी तांत्रिक विभाग असून या विभागाचे प्रमुख मुख्य अभियंता आहेत. त्यांचे अधिपत्याखाली अधिक्षक अभियंता–०, ४ कार्यकारी अभियंता (स्थापत्य) व ० यांत्रिकी कार्यकारी अभियंता असून सहायक अभियंता श्रेणी-१, सहायक अभियंता श्रेणी (स्थाप.)–१६, नगर रचनाकार-१, सहाय्यक अभियंता श्रेणी (२)-१४, शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता–१९, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक–९६, सन २०२१–२२ मध्ये नागपूर सुधार प्रन्यासमध्ये एकूण अधिकारी व कर्मचारी कार्यरत संख्या ३५१ व मंजूर संख्या ६४६ आहे. याव्यतिरिक्त मेट्रो विकासाच्या कामाकरिता आस्थापनेवर कार्यकारी अभियंता–० यांची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी–०, लेखा अधिकारी–१ यांची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यात आलेली आहे. नासुप्रमध्ये उच्च पदवी विभूषित व कार्यक्षम अधिकारी वर्ग कार्यरत आहे.

नागपूर सुधार प्रन्यासच्या अंदाजपत्रकातील खालील सर्व प्रकल्प वगळण्यात आलेले असून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अंदाजपत्रकात घेण्यात आलेले आहे :

- शांतीवन, चिचोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैयक्तिक वापराच्या वस्तुंचे जतन व संरक्षण/संवर्धन करणे कामी संग्रहालयाचे आधुनिकीकरण करणे व परिसराचे सुशोभिकरण.
- उत्तर नागपूर विधानसभा क्षेत्रातील कामठी रोड लगत ग्रेन गोडाऊनचे जागेवर "डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉन्व्हेंशन सेंटर" चे बांधकाम.
- श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी, ता. कामठी, जिल्हा नागपूर या तीर्थस्थळाचा विकास प्रकल्प.
- नागपूर शहरात गरीब लोकांकरिता प्रधानमंत्री आवास योजना (सर्वांना घरे, २०२२) अंतर्गत परवडणारी घरे (Affordable Housing) बांधण्याबाबत.
- विभागीय क्रिडा संकुलाची उर्वरित कामे नागपूर सुधार प्रन्यासद्वारे करण्याबाबत.
- मेयो सर्वोपचार रूग्णालय, नागपूर या संस्थेसाठी यंत्रसामुग्री खरेदी करण्याबाबत.
- आदिवासी मुलांचे वसतीगृह, मौजा चिखली (देव), खसरा क्र. १०३/१, १०३/२ आणि मौजा पारडी खसरा क्र.१४/३, भुखंड क्र. पी–२ येथे बांधकामाबाबत.
- मोठा ताजबाग, नागपूर येथील हजरतबाबा ताजुद्दिन दर्गा परिसराचे विकास आराखड्यांच्या कामाबाबत.
- मौजा चिखली (देवस्थान) येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर शहर (पूर्व) चे बांधकाम करण्याबाबत.
- नागपूर येथील लकडगंज पोलीस स्टेशन परिसरात प्रस्तावित पोलीस स्टेशन व पोलीस कर्मचाऱ्यांकरिता ३४८ निवासी गाळ्यांच्या प्रकल्पाबाबत.
- मौजा वाठोडा येथील सर्व सामान्य लोकांना परवडणाऱ्या घरकुल योजनेबाबत.
- नागपूर शहरात १० एस.टी.पी. चे बांधकाम.
- दिक्षाभूमी चौकातील मौजा लेंडरा ख.क्र. २५७/१ येथील अस्तित्वातील संत चोखामेळा वसतीगृहाच्या १००३०.५० चौ.मी. जागेत १००० मुलांचे वसतीगृहांच्या प्रस्तावित बांधकामाबाबत.
- शांतीवन चिचोली खसरा क्र. १२८ येथील ११.५० एकर जागेवर अस्तित्वात असलेल्या वस्तुसंग्रहालयाचे नुतनीकरण व सभोवतालच्या परिसराचे सौंदर्यीकरण व उर्वरित बांधकाम.
- स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष योजना अंतर्गत नागपूर येथे २००० आसन क्षमतेचे सभागृह बांधकाम.
- पर्यटन विकास योजने अंतर्गत "सी प्लेन" प्रकल्प.
- स्वदेश दर्शन योजने अंतर्गत धापेवाडा-पारडसिंगा-आदासा (Religious Circuit) च्या विकास आराखड्यास मंजूरी प्रदान करण्याबाबत.

- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने (National Lake Conservation Plan) अंतर्गत कोराडी तलाव संवर्धन प्रकल्प.
- दिक्षाभुमी स्तुपाचे नुतनीकरण व मजबुतीकरणाच्या कामाबाबत.
- बुद्धिस्ट सर्किट अंतर्गत दिक्षाभूमी नागपूर, शांतीवन चिचोली व ड्रॅगन पॅलेस कामठी जिल्हा नागपूरच्या विकास कामाबाबत.
- नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेस टेम्पल या पर्यटन स्थळ परिसरात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयासमोरील प्रांगणात संविधान प्रस्ताविका पार्कची उभारणी करण्याबाबत.
- फुटाळा तलाव येथे संगीत कारंजे, लाईट व लेझर मल्टिमिडीया शो तसेच अंबाझरी उद्यान येथे स्वामी विवेकानंद यांचे जीवनावर आधारित लाईट, साऊंड व मल्टीमिडीया शो.
- सक्करदरा तलाव सौंदर्यीकरण, इत्यादी प्रकल्प नामप्रविप्राला वळती करण्यात आलेले आहे.
- अनधिकृत लेआऊट मधील मंजूर व नामंजूर अभिन्यास :

  अनधिकृत लेआऊट मधील मंजूर व नामंजूर अभिन्यासात रु. २००.०० कोटीची कामे काढण्यात आलेली असून सद्या मंजूर रु. ९१.१८ कोटी तसेच नामंजूर अभिन्यासात रु. ८३.०२ कोटी इतका खर्च झालेला आहे व उर्वरित निधीचे काम प्रगतीपथावर आहे.

अंदाजपत्रकामधील ठळक वैशिष्ट्ये :

नागपूर सुधार प्रन्यासचे सन २०२१-२२ या वर्षाचे अर्थसंकल्प अंदाजपत्रकानुसार सुरुवातीची शिल्लक धरून एकूण जमा रु. ६०६.९६ कोटी अपेक्षित आहे. यात भांडवली जमा रु. ३७४.२६ कोटी, महसुली जमा रु. १३३.७८ कोटी आणि अग्रिम व ठेवी जमा रु. ४७.७० कोटींचा समावेश आहे.

नागपूर सुधार प्रन्यासद्वारे, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात भांडवली खर्च रुपये ३७४.४७ कोटी, महसुली खर्च रु. १४५.३४ कोटी आणि अग्रिम व ठेवी रु. ८३.०७ कोटी असे एकूण रु. ६०२.८८ कोटी विविध विकास कामावर खर्च करण्यात येणार आहे.

१. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात नासुप्र निधीतून घर बांधणी कार्यक्रम अंतर्गत रु. १२५ कोटी व भुखंड व दुकानाच्या भाडेपट्ट्याद्वारे प्रव्याजी रु. ७५ कोटी जमा अपेक्षित आहे.

२. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये ५७२ व १९०० अभिन्यासामध्ये एकंदर रु. ७० कोटी प्राप्त होणे अपेक्षित असून ५७२ आणि १९०० अभिन्यासामध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी रु. ७० कोटी खर्च करण्यात येत आहे.

३. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये नासुप्र निधीतून विकासाची विविध कामे व रस्त्यांचे डांबरीकरण या शिर्षा-अंर्तगत रु. ६० कोटी खर्च करण्याचे प्रावधान करण्यात आले आहे.

४. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये उद्यान, विकास, वृक्षारोपण या शिर्षाअंतर्गत रु. १ कोटीचे प्रावधान करण्यात आले असून विविध उद्यानाचे सौंदर्यीकरण विकास आणि संगोपनकरिता सदर निधी खर्च करण्यात येणार आहे.

५. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये दलित वस्ती सुधार योजना आमदार निधी, खासदार निधी, मौजा मानेवाडा येथील ई-लायब्ररी, इस्लामिक कल्चरल सेंटरचे बांधकामाकरिता व इतर शासकीय निधीच्या कामाकरिता रु. १०७.४९ कोटीचे प्रावधान केलेले आहे.

६. क्रिडांगणाच्या विकास केंद्र सरकारच्या "खेलो इंडिया" या अभियानाला पूरक म्हणून नागपूर शहारातील युवा पिढीमध्ये खेळाडू वृत्तीचा विकास करण्याच्या दृष्टीने नागपूर शहरातील सुमारे १०० क्रिडांगणाचा दर्जा उंचावण्याचे नासुप्र चे उद्दिष्ट आहे. त्याकरिता रु. १५ कोटीचे प्रावधान केलेले आहे.

७. शासन निर्णयानुसार सातव्या वेतनाचा लाभ सर्व कार्यालयीन अधिकारी/ कर्मचारी, निवृत्तीवेतनधारक यांना देण्यात येत असल्याने आस्थापना खर्चामध्ये रु. ८४.५२ कोटीचे प्रावधान करण्यात आले आहे.

(१०) आस्थापनीय खर्च :

- सर्व कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते (७ व्या वेतन आयोगाच्या अतिरिक्त तरतुदीचा समावेश) रु. ४३ कोटी तरतूद आहे.
- निवृत्तीवेतन विषयक तरतूद रु. ३२ कोटी तरतूद आहे.
- सुरक्षा रक्षक यांची सेवा पुरविण्याबाबत रु. ५ कोटी तरतूद आहे.
- कार्यालयीन खर्चकरिता रु. ५.६६ कोटीची तरतूद आहे.
- आकस्मिक खर्च करिता रु. ३०.१६ कोटीची तरतूद आहे.

नागरी परिवहन
Urban Transport

प्रकरण–५

नागरी परिवहन प्रकल्प

राज्यातील मुंबई, ठाणे, नागपूर, नाशिक व पुणे या शहरांमध्ये मेट्रो रेल्वे प्रकल्प ही नवीन सार्वजनिक वाहतूक प्रणाली विकसित करण्याचा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या शहरामधील रेल आधारीत मेट्रो रेल्वे प्रकल्पास राज्य शासनाने वेगवेगळ्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

(१) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP-२) :

मुंबईमधील उपनगरीय रेल्वे सेवांमध्ये आणखी सुधारणा करण्याच्या दृष्टीने मुंबई रेल्वे विकास महामंडळाने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-२ (MUTP-२) चा आराखडा तयार केला आहे. महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालय यांनी या प्रकल्पास मान्यता दिली आहे. भारत सरकार व जागतिक बँक यांच्यामध्ये दिनांक २३ जुलै २०१० रोजी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या प्रकल्पाचा खर्च राज्य शासन व केंद्र शासन ५० : ५० या प्रमाणात करणार आहे. प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ५३०० कोटी (एमयुटीपी-२अ रु.३६६१ कोटी व एमयुटीपी-२ब - रु.१६६९ कोटी) इतका आहे. एमयुटीपी-२अ प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून रु. १९१० कोटी कर्ज घेण्यात आले आहे. एमयुटीपी-२अ प्रकल्पामध्ये रेल्वे डब्यांची खरेदी, रेल्वे गाड्यांची देखभाल व्यवस्था, ट्रिसपास कंट्रोल उपाययोजना, तांत्रिक सहाय्य, इत्यादी घटक प्रकल्पांचा समावेश असून एमयुटीपी-२ब मध्ये सीएसएमटी-कुर्ला दरम्यान ५ वी व ६ वी मार्गिका, ठाणे-दिवा दरम्यान ५ वी व ६ वी मार्गिका, हार्बर लाईनचा विस्तार, रेल्वे स्थानकांची सुधारणा, ट्रिसपास कंट्रोल उपाययोजना इत्यादी घटक प्रकल्पांचा समावेश आहे. एमयुटीपी-२अ अंतर्गत घटक प्रकल्पांची अंमलबजावणी कार्यवाही पूर्ण झाली असून एमयुटीपी-२ब मधील काही घटक प्रकल्प पूर्ण झाले आहेत तर काही अंमलबजावणीच्या विविध टप्यात आहेत. सदर प्रकल्पावर प्रकल्प अंमलबजावणी संस्था मुंबई रेल्वे विकास महामंडळ प्रथम खर्च करते, झालेल्या खर्चाच्या ५० टक्के खर्च महाराष्ट्र शासनाच्यावतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मुंबई रेल्वे विकास महामंडळास अदा करण्यात येतो व मुंबई रेल्वे विकास महामंडळ केलेल्या खर्चाचे प्रतिपूर्ती दावे जागतिक बँकेस खर्च केल्यानंतर सादर करते. जागतिक बँकेने सदर प्रतिपूर्ती दावे मंजूर केल्यानंतर तेवढीच रक्कम जागतिक बँकेकडून केंद्र शासनास वितरित केली जाते. तद्नंतर, त्यामधील राज्य शासनाच्या हिश्श्याची म्हणजेच ५० टक्के रक्कम अतिरिक्त केंद्रीय सहाय्य म्हणून राज्य शासनास वितरित केली जाते व सदर रक्कम अर्थसंकल्पीत करून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला वितरीत करण्यात येते. सदर प्रकल्पाची आतापर्यंत एकूण ८१ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(२) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ (MUTP-३) :

मुंबई उपनगरी रेल्वे सेवामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने भारतीय रेल्वेच्या सहभागाने मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-१ व टप्पा-२ च्या धर्तीवर रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांचा ५०:५० टक्के आर्थिक सहभाग तत्त्वावर मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ (MUTP-३) राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पात विरार-डहाणू दरम्यान रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण करणे, कर्जत-पनवेल मार्गाचे दुपदरीकरण करणे, ऐरोली-कळवा दरम्यान उन्नत रेल्वे मार्ग बांधणे. नवीन रेल्वे गाड्या खरेदी करणे, पश्चिम रेल्वे मार्गाच्या मध्य विभागात ट्रेस पास कंट्रोल बांधणे, तसेच तांत्रिक सहाय्य अशा कामांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालय यांनी या प्रकल्पास मान्यता दिली आहे. या प्रकल्पाचा खर्च केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामार्फत ५० : ५० टक्के या प्रमाणात करण्यात येणार आहे. प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. १०९४८ कोटी इतका आहे. सदर प्रकल्पासाठी रू.३५०० कोटी रक्कमेचे एआयआयबी बँकेचे केंद्र व राज्य शासनाकडून समप्रमाणात कर्ज घेण्यात आले आहे व उर्वरित रु. ७४४७ कोटी रक्कम राज्य व केंद्र शासनाने वहन करावयाची आहेत. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या ५० टक्के आर्थिक हिश्श्याचा भार काही प्रमाणात सिडको तर उर्वरित मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मार्फत सोसावयाचा आहे.

(३) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३अ (MUTP-3A) :

मुंबई उपनगरी रेल्वे सेवामध्ये आणखी सुधारणा करण्याच्या दृष्टीने भारतीय रेल्वेच्या सहभागाने मुंबई रेल्वे विकास महामंडळामार्फत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-१, २, ३ च्या धर्तीवर रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांचा ५०:५० टक्के आर्थिक सहभाग तत्त्वावर मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३अ (MUTP-3A) राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीस राज्य शासनाने माहे डिसेंबर, २०१८ मध्ये मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने काही घटक प्रकल्प वगळून माहे मार्च, २०१९ मध्ये प्रकल्पास मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पात सीएसएमटी-पनवेल, सीएसएमटी-कल्याण व चर्चगेट-विरार रेल्वे मार्गिकेवर सीबीटीसी प्रणाली लागू करणे, रेल्वे स्थानकांचा विकास व नव्या रेल्वे गाड्या खरेदी करणे, रेल्वे गाड्यांची देखभाल सुविधा, तांत्रिक सहाय्य, कल्याण-बदलापूर दरम्यान ३री व ४ थी मार्गिका टाकणे, बोरीवली-विरार दरम्यान ५वी व ६वी मार्गिका टाकणे, कल्याण व आसनगाव दरम्यान ४ थी मार्गिका टाकणे, गोरेगाव ते बोरिवली हार्बर मार्गिकेचा विस्तार, कल्याण जंक्शन येथे लांब पल्ल्याच्या व उपनगरीय रेल्वे मार्गिकांचे विभाजण करणे इ. महत्त्वाच्या कामांचा समावेश आहे. या प्रकल्पाचा खर्च केंद्र शासन व राज्य शासन यांच्यामार्फत ५० : ५० टक्के या प्रमाणात करण्यात येणार आहे. प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु.३३६९० कोटी इतका आहे. सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या ५० टक्के आर्थिक हिश्श्याचा भार काही प्रमाणात सिडको, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका यांनी सोसावयाचा आहे. अंमलबजावणीस सोयीच्या दृष्टीने सदर प्रकल्प एमयुटीपी-३अ-१ (रु. १४२२० कोटी) व एमयुटीपी-३अ-२ (रु. १९४७० कोटी) असा विभागण्यात आला आहे. एमयुटीपी-३अ-१ व एमयुटीपी-३अ-२ करिता अनुक्रमे एआयआयबी व एनडीबी बँकेचे प्रत्येकी रु.३५०० कोटी रक्कमेचे कर्ज घेण्याचे नियोजित आहे.

(४) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-२अ :

मुंबई मेट्रो मार्ग-२अ दहीसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्गाचा टप्पा-अ दहीसर(पू.)- डी. एन. नगर या (लांबी १८.६ कि.मी. स्थानके-१७) प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ६४१० कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबवणार आहे. या प्रकल्पासाठी एडीबी व एनडीबी या आंतरराष्ट्रीय बँकांकडून कर्ज घेण्यात आले असून त्याची

परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी एमएमआरडीएने स्वनिधीतून रु. १८९२ कोटी उपलब्ध करावयाचे आहेत. केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य/ स्थानिक करांसाठी मिळून प्रकल्प रु. ७५७.५० कोटी राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाचे आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर आहे.

(५) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-२ब :

मुंबई मेट्रो मार्ग-२ब, डी.एन.नगर-मंडाळे मेट्रो मार्गाचा टप्पा-ब या (लांबी २३.६ कि.मी. स्थानके-२०) प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. १०९८६ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. या प्रकल्पासाठी एडीबी व एनडीबी या आंतरराष्ट्रीय बँकांकडून कर्ज घेण्यात आले असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणाने स्वनिधीतून रु. ३७११ कोटी उपलब्ध करावयाचे आहेत. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य / स्थानिक करांसाठी मिळून एकूण रु. १२९० कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर आहे.

(६) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन ३ :

मुंबई मेट्रो लाईन- ३ (कुलाबा-बांद्रा-सिप्झ) या (लांबी ३३.५ कि.मी. स्थानके-२७) प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. २३१३६ कोटी आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी केंद्र व राज्य शासनाचा ५० : ५० टक्के समभाग असलेल्या संयुक्त मालकीच्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या विशेष हेतू वाहन (एसपीव्ही) कंपनीकडून राबविण्यात येणार आहे. मुंबई मेट्रो-३ प्रकल्पातील केंद्र शासनाचा आर्थिक सहभाग (इक्विटी) हा समभाग व दुय्यम कर्ज सहाय्य या स्वरूपात राहणार आहे. तसेच राज्य शासनाचा सहभाग देखील हा बिनव्याजी दुय्यम कर्ज स्वरूपात राहणार आहे. या प्रकल्पातील राज्य शासनाच्या समभागाची रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वहन करावयाची आहे. सदर प्रकल्पासाठी जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेकडून कर्ज सहाय्य घेण्यात आले आहे. असा प्रकल्पाचा सर्व निधी हा सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणी करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या विशेष हेतू वहन कंपनीकडे सुपूर्द करावयाचा आहे. कर्जाची परतफेड या विशेष हेतू वाहन कंपनीने करावयाची आहे.सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पातील राज्य शासनाचा समभाग रु. २४०२.७ कोटी शासनाच्यावतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणमार्फत उपलब्ध करून देण्यात येणार असून केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य शासनाचे कर (१०० टक्के) तसेच खाजगी जमीन संपादन व पुनर्वसन याकरिता एकूण रु. २४२१.१० कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाचे आहे. जपान अंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेकडून रु. १३२३५ कोटी इतके कर्ज सहाय्य घेण्यात आले आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ६८ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(७) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन ४ :

मुंबई मेट्रो मार्ग-४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या (लांबी ३२.५ कि.मी. स्थानके-३०) प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. १४५४९ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. सदर प्रकल्पातील खर्चामधील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य / स्थानिक करांसाठी राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज या स्वरूपात निधी वितरित करावयाचा आहे. सदर प्रकल्पासाठीचे राज्य शासनाचे दुय्यम कर्ज हे परतफेड करावयाचे आहे. या प्रकल्पासाठी केएफडब्ल्यु या आंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु. ५९६१ कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य / स्थानिक करांसाठी मिळून एकूण रु. ३६९३ कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ३० टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(८) मुंबई मेट्रो मार्ग ४अ :

मुंबई मेट्रो मार्ग-४अ (कासारवडवली-गायमुख) (मेट्रो लाईन-४अ चा विस्तार) या (लांबी २.७ कि.मी. स्थानके-२) मेट्रो प्रकल्पास मा. मंत्रिमंडळाने दिनांक २७ नोव्हेंबर २०१८ रोजी मान्यता दिली आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा स्वतःचा निधी, राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य व उर्वरित निधी वित्तिय संस्थेकडून कर्ज सहाय्य या माध्यमातून निधी उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ९४९ कोटी इतका आहे. या प्रकल्पासाठी केएफडब्ल्यु या आंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे.

सदर प्रकल्पात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रु. ५१७.५१ कोटी, राज्य शासनामार्फत केंद्रीय कराच्या (५० टक्के) आणि राज्य शासनाच्या कराच्या (१०० टक्के रक्कम व जमिनीचा खर्च याकरिता रु. १५७.७७ कोटी इतके दुय्यम कर्ज व उर्वरित आंतरराष्ट्रीय बँकेचे कर्ज अशा प्रकारे निधी उभारावयाचा आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत १७ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(९) मुंबई मेट्रो मार्ग-५ :

मुंबई मेट्रो मार्ग-५ ठाणे-भिवंडी-कल्याण या (लांबी २४.९ कि.मी. स्थानके-१५) प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ८४१६.५१ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु. ४७०७ कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य शासनाचे कर (१०० टक्के) तसेच जमिनीची किंमत याकरिता एकूण रु. १३५२.२५ कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून ठाणे-भिवंडी या टप्पा-१ मध्ये आतापर्यंत ३५ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(१०) मुंबई मेट्रो मार्ग-६ :

मुंबई मेट्रो मार्ग ६ स्वामी समर्थ नगर-जोगेश्वरी-विक्रोळी या (लांबी १४.५ कि.मी. स्थानके-१३) प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ६७१६ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. सदर प्रकल्पातील खर्चामधील केंद्र शासनाचे कर ५० टक्के व राज्य शासनाचे कर (१०० टक्के) तसेच जमिनीची किंमत याकरिता राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज या स्वरूपात निधी वितरित करावयाचा आहे. सदर प्रकल्पासाठीचे राज्य शासनाचे दुय्यम कर्ज हे परतफेड करावयाचे आहे. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु. ३१९५.०२ कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य शासनाचे कर (१०० टक्के) तसेच जमिनीची किंमत याकरिता एकूण रु.१८२०.५९ कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ३६ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(११) मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-७ :

मुंबई मेट्रो मार्ग- ७, अंधेरी (पूर्व)-दहिसर (पूर्व) या (लांबी १६.५ कि.मी. स्थानके-१३) प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ६२०८ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. सदर प्रकल्पातील खर्चामधील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य/स्थानिक करांसाठी राज्य शासनाकडून दुय्यम कर्जे या स्वरूपात निधी वितरित करावयाचा आहे. सदर प्रकल्पासाठीचे राज्य शासनाचे दुय्यम कर्ज हे परतफेड करावयाचे आहे. या प्रकल्पासाठी एडीबी व एनडीबी या आंतरराष्ट्रीय बँकांकडून कर्ज घेण्यात आले असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु.२३२० कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य / स्थानिक करांसाठी मिळून एकूण रु. ७३३.५० कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे व उर्वरित रक्कम ही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून कर्ज रूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम अंतिम टप्प्यात आहे.

(१२) मुंबई मेट्रो मार्ग ९ व ७अ :

मेट्रो मार्ग ९ (दहिसर ते मिरा-भाईंदर) पूर्णतः उन्नत (लांबी १०.४० कि.मी.) व मेट्रो मार्ग ७अ अंधेरी ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (मेट्रो मार्ग ७ चा विस्तार) या (लांबी ३.१७ कि.मी.) मेट्रो रेल्वे प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा स्वतःचा निधी, राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य व उर्वरित निधी वित्तिय संस्थेकडून कर्ज सहाय्य या माध्यमातून निधी उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ६६०७ कोटी इतका आहे. सदर प्रकल्पात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रु. ३३३६.५१ कोटी राज्य शासनामार्फत केंद्रीय कराच्या (५० टक्के) आणि राज्य शासनाच्या कराच्या (१०० टक्के रक्कम व जमिनीचा खर्च याकरीता रु. १६३१.२४ कोटी इतके बिनव्याजी दुय्यम कर्ज व वित्तीय संस्थेकडून रु. १६३९.२५ कोटीचे कर्ज प्राप्त होणार आहे. मेट्रो मार्ग ९ प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत १२.५ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे. मेट्रो मार्ग ७अ च्या अंमलबजावणीकरिता भारतीय विमानतळ प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाचे काम हाती घेण्याचे नियोजित आहे.

(१३) मुंबई मेट्रो मार्ग - १०:

मुंबई मेट्रो मार्ग- १० गायमुख ते शिवाजी चौक (मिरा रोड) या मार्गिकेची एकूण लांबी ९.२०९ कि.मी. असून (८.५२९ कि.मी. उन्नत मार्ग) आणि (०.६८ कि.मी. भुयारी मार्ग) यामध्ये एकूण ४ उन्नत मेट्रो स्थानके प्रस्तावित आहेत. प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ४४७६ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. या प्रकल्पासाठी बहुपक्षीय / आंतरराष्ट्रीय अशा विविध वित्तिय संस्थांकडून कर्ज घेण्यात येणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु. ३५४.७७ कोटी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य शासनाचे कर तसेच जमिनीची किंमत याकरिता एकूण रु. ७७६.७१ कोटी राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पासाठी सामान्य सल्लागार नियुक्तीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(१४) मुंबई मेट्रो मार्ग-११ :

मुंबई मेट्रो मार्ग- ११, वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (लांबी १२.७७४ कि.मी., १० स्थानके) या प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ८७३९ कोटी आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण राबविणार आहे. सदर प्रकल्पातील खर्चामधील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य/ स्थानिक करांसाठी राज्य शासनाकडून रु. ९३२ कोटी इतके दुय्यम कर्ज या स्वरूपात निधी वितरित करावयाचा आहे. सदर प्रकल्पासाठीचे राज्य शासनाचे दुय्यम कर्ज हे परतफेड करावयाचे आहे. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय/ आंतरदेशीय वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पात प्राधिकरणामार्फत रु. ३१३३.३१ कोटी उपलब्ध करुन देण्यात येणार असून मुंबई पोर्ट ट्रस्टचा आर्थिक सहभाग हा जमिनीच्या स्वरूपात राहणार आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पासाठी सामान्य सल्लागार नियुक्तीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(१५) मुंबई मेट्रो मार्ग-१२ :

मेट्रो मार्ग १२ (कल्याण ते तळोजा) याची लांबी २०.७५६ कि.मी. (उन्नत) असून त्यामध्ये १७ स्थानकांचा समावेश केला आहे. या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा स्वतःचा निधी, केंद्र शासनाचा सहभाग, राज्य शासनाचे दुय्यम कर्ज सहाय्य सिडको, एमआयडीसी यांचा आर्थिक सहभाग राहणार असून उर्वरित निधी आंतरराष्ट्रीय वित्तिय संस्थेकडून कर्ज सहाय्य या माध्यमातून उभारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ५८६५ कोटी इतका आहे. सदर प्रकल्पात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रु. ७९८.३८ कोटी (५०% केंद्र शासनाच्या करांकरिताच्या रक्कमेसह),

सिडको मार्फत रु. ७०८.१२ कोटी एमआयडीसी कडून रु. २४८ कोटी, राज्य शासनामार्फत बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य रु. २६८ कोटी, केंद्र शासनाचा सहभाग रु. ७६५.५० कोटी व बाह्य वित्तीय संस्थेकडून रु. ३०७७ कोटीचे कर्ज असा आर्थिक सहभाग राहणार आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पासाठी सामान्य सल्लागार नियुक्तीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(१६) नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-१ :

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पांतर्गत मार्गिका क्र. १ ऑटोमोटीव्ह चौक ते मिहान (उत्तर-दक्षिण मार्गिका) व मार्गिका क्र. २ प्रजापती नगर ते लोकमान्य नगर (पूर्व-पश्चिम मार्गिका) अशा दोन मेट्रो मार्गिकांचा समावेश आहे. सदर प्रकल्प पूर्णत्वासाठीचा अपेक्षित खर्च रु. ८६८० कोटी आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्प महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) या विशेष हेतू वहन कंपनीकडून राबविण्यात येत आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पातील केंद्र व राज्य शासनाचा सहभाग हा गुंतवणूक/समभाग (Equity) व दुय्यम कर्ज सहाय्य या स्वरूपात राहणार आहे. तसेच या प्रकल्पात नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका यांचे अनुदान देखील उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पासाठी केएफडब्ल्यु व एफडी, जर्मनी या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांचे कर्ज सहाय्य घेण्यात आले आहे. सदरचे बाह्य कर्ज केंद्र शासनामार्फत घेण्यात आले असून थेट महामेट्रोला वितरीत करण्यात येत आहे. सदर कर्जाची परतफेड या विशेष हेतू वहन कंपनीने करावयाची आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पात सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून समभाग स्वरूपात रु. १११४ कोटी व केंद्रीय कराच्या ५० टक्के खर्चासाठी केंद्र शासनाकडून रु.४४१ कोटी दुय्यम कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राज्य शासनाच्या वतीने समभाग म्हणून एकूण रु. १११४ कोटी व केंद्रीय कराच्या ५० टक्के रक्कम रु. ४४१ कोटी आणि राज्य/स्थानिक करांसाठीच्या रु. १८१ कोटी मिळून एकूण रु. ६२२ कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाची आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ९६ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(१७) नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२ :

सदर मेट्रो रेल्वे प्रकल्प महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) या विशेष हेतू वहन कंपनीकडून राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ६७०८ कोटी इतका आहे. त्यामध्ये राज्य शासनाचा सहभाग हा समभाग रु.९९८.२ कोटी व दुय्यम कर्ज सहाय्य रु. २१२ कोटी असा असून केद्र शासनाचा सहभाग हा समभाग रु. ९९८.२ कोटी व दुय्यम कर्ज सहाय्य रु.१९७ कोटी असा राहणार आहे. इतर भागधारकांकडून रु. ७१७ कोटी उपलब्ध होणार आहेत. तसेच, एफडी, जर्मनी या बाह्य वित्तीय सहाय्य संस्थेकडून रु.३५८५.६ कोटी कर्ज घेण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाची एकूण लांबी ४३.८० कि.मी. इतकी असून त्यामध्ये कॉरिडोर १A-मिहान ते एमआयडीसी ईएसआर, कॉरिडोर २A-ऑटोमेटीव्ह स्केअर ते कन्हान नदी, कॉरिडोर ३A-लोकमान्य नगर ते हिंगणा व कॉरिडोर ४A-प्रजापती नगर ते ट्रान्सपोर्ट नगर यांचा समावेश आहे. सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्या पीआयबी बोर्डाने दि. २४ मार्च, २०२१ रोजी मान्यता दिली आहे. सद्यस्थितीत सदर प्रकल्पास केंद्र शासनाची मान्यता प्रलंबित असून मंजूरी प्राप्त होताच प्रकल्प काम हाती घेण्यात येणार आहे.

(१८) पुणे महानगर मेट्रो रेल्वे प्रकल्प :

पुणे महानगर मेट्रो रेल प्रकल्प टप्पा-१ मधील मार्गिका क्र. १ (पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट) व मार्गिका क्र. २ (वनाझ ते रामवाडी) या प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ११४२० कोटी आहे. सदर प्रकल्प महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. या केंद्र व राज्य शासनाचा ५०:५० संयुक्त सहभाग असलेली विशेष हेतू वाहन कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून समभाग स्वरूपात तसेच केंद्रीय कराच्या ५० टक्के खर्चासाठी केंद्र शासनाकडून दुय्यम कर्ज या स्वरूपात निधी वितरित करावयाचा आहे. सदर प्रकल्पात केंद्र व राज्य शासनाचा सहभाग हा समभाग (इक्विटी) व दुय्यम कर्ज स्वरूपात आहे. या प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय बँकेकडून कर्ज घेणार असून त्याची परतफेड प्रकल्पाच्या विशेष हेतू कंपनीकडून करण्यात येणार आहे. सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून समभाग स्वरूपात रु. १३१० कोटी व केंद्रीय कराच्या ५० टक्के खर्चासाठी केंद्र शासनाकडून रु. ६४४ कोटी दुय्यम कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राज्य शासनाकडून समभाग स्वरूपात रु. १३१० कोटी व प्रकल्पावरील केंद्रीय कराच्या ५० टक्के व राज्य/स्थानिक करांसाठी मिळून एकूण रु. ९४६.२० कोटी दुय्यम कर्ज सहाय्य म्हणून उपलब्ध करावयाचे आहेत. तसेच, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून रु. ५८३१.५ कोटी कर्जरूपाने उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पाचे स्थापत्य काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ६१ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

(१९) पिंपरी-चिंचवड (पी.सी.एम.सी.) ते निगडी कॉरीडॉर क्र.१ए :

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रस्तावित केल्यानुसार पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-१ मधील मार्गिका क्रमांक-१ (पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट) च्या विस्तारीत " पिंपरी-चिंचवड (पी.सी.एम.सी.) ते निगडी कॉरीडॉर क्र.१ए " उन्नत मेट्रो मार्गीकेची महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (महामेट्रो) मार्फत अंमलबजावणी करण्याबाबतच्या रु.९४६.७३ कोटी प्रकल्प पुर्णत्व खर्चाच्या सुधारित प्रस्तावास मा.मंत्रीमंडळाने दि. १७.०२.२०२१ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. सुधारित मान्यतेनुसार माहे मार्च, २०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयास मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. त्यावर केंद्र शासनाने सूचित केल्यानुसार, महामेट्रोने सादर केलेल्या सुधारित प्रकल्प खर्च व वित्तिय सहभाग आराखडा मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. सदर प्रकल्पास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येणार आहे.

(२०) हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो रेल्वे प्रकल्प :

हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो रेल्वे प्रकल्पाची सार्वजनिक खाजगी सहभागाने संकल्पना करा, बांधा, आर्थिक पुरवठा करा, वापरा व हस्तांतरित करा (DBFOT) तत्त्वावर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्याकरिता मा. मंत्रिमंडळाने दिनांक ०२ जानेवारी २०१८ रोजीच्या बैठकीमध्ये तत्त्वतः मान्यता दिली आहे. सदर बैठकीमध्ये मा. मंत्रिमंडळाने या प्रकल्पाची २३.३ कि.मी. छन्न मार्गावर संकल्पना करा, बांधा, आर्थिक पुरवठा करा, चालवा व हस्तांतरित करा DBFOT तत्त्वावर सार्वजनिक खाजगी सहभागाने (PPP) उभारणी करण्यास मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. ८३१३ कोटी इतका आहे. पीएमआरडीए

व सवलतकार कंपनी, पुणे आयटी सिटी मेट्रो रेल मर्यादित (Consortium of TRIL Urban Transport Pvt. Ltd. And Siemens Project Ventures GmbH, Siemens AG, Germany) यांच्या दरम्यान दि. २१ सप्टेंबर २०१९ रोजी सवलत करारनामा स्वाक्षांकित करण्यात आला आहे. सदर प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास दि.२५ नोव्हेंबर, २०२१ पासून सुरूवात झाली असून प्रकल्प बांधकाम कालावधी ४० महिने असा आहे.

(२१) नाशिक मेट्रो रेल्वे प्रकल्प :

नाशिक महानगर प्रदेश क्षेत्रात सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्था प्रकल्प (MRTS) अंतर्गत मेट्रो प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पांतर्गत नाशिक शहरात मुख्य उन्नत मार्गिका क्र. १ गंगापूर ते नाशिक रोड रेल्वे स्थानक (लांबी २२.५ कि.मी. उन्नत मार्ग व २० स्थानके) व मुख्य उन्नत मार्गिका क्र. २ गंगापूर ते मुंबई नाका (लांबी १०.५ कि.मी. उन्नत मार्ग व १० स्थानके) तसेच मुख्य मार्गिका व्यतिरिक्त दोन पुरक मार्ग- एक पुरक मार्ग मुंबई नाका ते सातपूर कॉलनी (११.५ कि.मी.) आणि दुसरा नाशिक स्थानकापासून नांदूर नाका मार्गे शिवाजीनगर (१४.५ कि.मी.) या दरम्यान अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु. २१०० कोटी आहे. सदर प्रकल्पात केंद्र शासन, राज्य शासन, सिडको, एमआयडीसी, नाशिक महानगरपालिका यांचा आर्थिक सहभाग राहणार आहे. सदर प्रकल्पासाठी बाह्यसंस्थेकडून कर्ज सहाय्य घेण्यात येणार आहे.

(२२) ठाणे मेट्रो रेल्वे प्रकल्प :

ठाणे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्प (लांबी २८.८ कि.मी.) प्रकल्पाची अंमलबजावणी महामेट्रो या विशेष उद्देश वाहन कंपनीमार्फत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. ठाणे मेट्रो मार्ग या प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. १०४१२.६१ कोटी आहे. सदर प्रकल्पात राज्य शासनाचा सहभाग हा समभाग रु. ११८०.८८ कोटी व दुय्यम कर्ज सहाय्य- रु. ३४३१.९२ कोटी तसेच केंद्र शासनाचा सहभाग हा समभाग- रु. ११८०.८८ कोटी व दुय्यम कर्ज सहाय्य- रु. २३७.२१ कोटी असा राहणार आहे. सदर प्रकल्पासाठी रु.४०५४.२५ कोटी चे बाह्य कर्ज घेण्यात येणार आहे. ठाणे महानगरपालिकेचा वित्तीय सहभाग रु.२०० कोटी इतका राहणार असून उर्वरीत रु. १२७.४७ कोटी इतर माध्यमातून उपलब्ध होणार आहेत. राज्य शासनाकडून प्रकल्पाचा प्रस्ताव दि.११.०८.२०२१ रोजी केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालयाकडे पाठविण्यात आला आहे. सद्यस्थितीत केंद्र शासनाची मान्यता प्रलंबित आहे.

(२३) स्व. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक :

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती जपण्यासाठी मुंबईतील शिवाजी पार्क, दादर येथील महापौर निवास स्थान परिसरातील जागेवर स्व.बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी शासनाने दि. २८ फेब्रुवारी, २०२१ रोजी सुधारीत मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या सुधारित आराखडयाप्रमाणे स्मारकासाठी प्रत्यक्ष करावयाचे बांधकाम व पुरविण्यात येणारी सोयी-सुविधा यांनुसार कामाचे टप्पा-१ व टप्पा-२ असे वर्गिकरण करण्यात आले आहे. टप्पा-१ मधील कामासाठी रु.२५० कोटी व टप्पा-२ मधील कामासाठी रु.१५० कोटी असे एकूण रु. ४०० कोटी (सर्व करांसहीत) इतक्या रक्कमेचे ढोबळ अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर प्रकल्पाच्या टप्पा १ मध्ये सर्व इमारतींची बांधकामे करणे प्रस्तावित असून, यामध्ये स्थापत्य, विद्युत, वातानुकुलितयंत्रणा उभारणी, इमारतीच्या अंतर्गत व बाहय सजावट, वाहनतळ उभारणी, बागबगीचा तयार करणे, रेनवॉटर हार्वेस्टिंग इत्यादी कामांचा समावेश आहे. सदर प्रकल्पाच्या टप्पा २ मध्ये तंत्रज्ञान, लेझर शो, डिजिटल मॅपिंग प्रोजेक्शन, कथा/गोष्टी सांगणे, चित्रपट, व्हर्च्युअल रियालिटी, ऑडिओ व्हिज्युअल आणि तांत्रिक घटक इत्यादी कामे इमारतीचे बांधकामाचे काम पूर्णत्वास येत असताना हाती घ्यावयाचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाच्या उभारणीकरिता एमएमआरडीएने सुरूवातीस खर्च करावयाचा असून अशा खर्चाची प्रतिपुर्ती शासनाच्या नगर विकास विभागामार्फत करण्यात येणार आहे. स्मारक प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत २६ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे.

नागरी जमीन कमाल मर्यादा
Urban Land Ceiling

प्रकरण ६

नागरी जमीन कमाल धारणा

राज्यात नागरी क्षेत्रातील जमीन गृहनिर्माणाकरिता उपलब्ध व्हावी या दृष्टीने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ निरसित करून नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ दिनांक २९ नोव्हेंबर २००७ पासून अंगीकृत केला आहे.

निरसन अधिनियम, १९९९ च्या तरतुदी अन्वये सदर अधिनियम अंमलात येण्यापूर्वी शासन ताब्यात घेण्यात आलेल्या जमिनीचे व्यवस्थापन करण्याची तसेच नाजकधा अधिनियम, १९७६ चे कलम २०(१) अन्वये अतिरिक्त जमिनीस विविध प्रयोजनांसाठी सूट दिलेल्या आदेशांच्या अंमलबजावणीची कार्यवाही सुरू आहे.

मंत्रालय (नगरविकास विभाग)

Mantralaya (Urban Development Department)

प्रकरण ७

नगरविकास विभाग

नगरविकास विभागामध्ये महानगरपालिका व नगरपालिका, नगररचना, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको इ. महत्त्वाचे विषय असून विभागाचे कामकाज ३५ कार्यासनात विभागले आहे. विभागात १ अपर मुख्य सचिव व १ प्रधान सचिव असून त्यांना त्यांच्या कामात १ सहसचिव, १ संचालक नगररचना तथा सहसचिव, ७ उप सचिव, ११ अवर सचिव, १ अवर सचिव (विधि), १ लेखा अधिकारी, २४ कक्ष अधिकारी व २ नगर रचनाकार सहाय्य करीत असतात. विभागात कार्यासनांच्या कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम सहसचिव/उप सचिव या दर्जाचे पर्यवेक्षीय अधिकारी करतात. या विभागात **राजपत्रित** अधिकारी व **अराजपत्रित** कर्मचारी मिळून २३० असा कर्मचारीवृंद आहे.

नगरविकास विभागातील कामकाजाची विभागणी अपर मुख्य सचिव (नवि-१), व प्रधान सचिव (नवि-२) यांच्यामध्ये खालीलप्रमाणे करण्यात आली आहे :–

अपर मुख्य सचिव (नवि-१)

(१) नगररचनाविषयक सर्व बाबी.

(२) संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण विभाग, पुणे यांच्या आस्थापनाविषयक बाबी.

(३) शहर व औद्योगिक विकास महामंडळाच्या बाबी.

(४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाविषयक बाबी.

(५) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पी.एम.आर.डी.ए.)

(६) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(७) नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(८) औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(९) कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण

(१०) महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, नागपूर

(११) मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, मुंबई

(१२) मुंबई रेल्वे विकास महामंडळ, मुंबई

(१३) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ व निरसन अधिनियम, १९९९ अंतर्गत सर्व बाबी.

(१४) विभागाची आस्थापना.

प्रधान सचिव (नवि-२)

(१) राज्यातील सर्व महानगरपालिकेच्या प्रशासकीय बाबी.

(२) राज्यातील सर्व नगरपरिषदेच्या प्रशासकीय बाबी.

(३) नगरविकास विभागाशी संबंधित अर्थसंकल्पविषयक सर्व बाबी.

(४) महानगरपालिका, नगरपालिका व नगरपालिका संबंधित अधिनियम, अधिनियमातील सुधारणाविषयक बाबी.

(५) विधानमंडळाशी संबंधित सर्व बाबी.

(६) अग्निशामक सल्लागार आस्थापना.

(७) संचालक, नगरपालिका प्रशासन आस्थापना.

(८) केंद्र शासन पुरस्कृत विविध अभियान.

नगरविकास विभाग

प्रधान सचिव (नवि-१)

सह सचिव १

उप सचिव २

अवर सचिव ५

कक्ष अधिकारी १०

नगर रचनाकार-२

प्रधान सचिव (नवि-२)

सह सचिव ०१

उप सचिव ०५

अवर सचिव ६

कक्ष अधिकारी १४

अधिनस्त कार्यालये

(१) शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)

(२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.)

(३) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पी.एम.आर.डी.ए.)

(४) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(५) नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(६) औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(७) कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण

(८) महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, नागपूर

(९) मुंबई मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, मुंबई

(१०) मुंबई रेल्वे विकास महामंडळ, मुंबई

(११) संचालक, नगररचना

(१२) सक्षम प्राधिकारी (ULC)

(१३) विभागातील (खुद्द) ची आस्थापना

(१) महानगरपालिका (सर्व)

(२) नगरपालिका/नगरपंचायती (सर्व)

(३) पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

(४) नागपूर सुधार प्रन्यास

(५) नगरपालिका प्रशासन संचालनालय

(६) अग्निशमन सल्लागार कार्यालय

अ.क्र. (१)	गट (२)	मंजूर पदे (३)	भरलेली पदे (४)	रिक्त पदे (५)
१	अ	२८	२७	१
२	ब	९७	७७	२०
३	क	७४	४५	२९
४	ड	३१	१५	१६
	एकूण...	२३०	१६४	६६

नगरविकास विभागाकडील प्रमुख योजना व त्याचेसाठी सन २०२२-२३ मध्ये केलेली तरतूद

अ.क्र.	योजनेचे नाव	अर्थसंकल्पित तरतूद (रु.कोटीत)
(१)	(२)	(३)
१	अमृत अभियान मनपा (केंद्र हिस्सा)	१२००
२	अमृत अभियान मनपा (राज्य हिस्सा)	६००
३	अमृत अभियान नगरपरिषद (केंद्र हिस्सा)	८००
४	अमृत अभियान नगरपरिषद (राज्य हिस्सा)	४००
५	अमृत अभियान राज्यअभियानावरील आस्थापना सहायक अनुदान	७०
६	स्मार्ट सिटीज मनपा (केंद्र हिस्सा)	१११६
७	स्मार्ट सिटीज मनपा (राज्य हिस्सा)	५५८
८	स्मार्ट सिटीज अभियानांतर्गत विशेष उद्देष वाहनांसाठी प्रशासकीय व कार्यालयीन खर्च	६०
९	स्मार्ट सिटीज (राज्य हिस्सा)	३०
१०	स्वच्छ भारत अभियान मनपा (केंद्र हिस्सा)	६००
११	स्वच्छ भारत अभियान मनपा (राज्य हिस्सा)	४००
१२	स्वच्छ भारत अभियान नगरपरिषद (केंद्र हिस्सा)	२२५
१३	स्वच्छ भारत अभियान नगरपरिषद (राज्य हिस्सा)	१५०
१४	स्वच्छ भारत अभियान नगरपंचायत (केंद्र हिस्सा)	२२५
१५	स्वच्छ भारत अभियान नगरपंचायत (राज्य हिस्सा)	१५०
१६	महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियानांतर्गत मनपांसाठी सहायक अनुदान	२००
१७	महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियानांतर्गत नगरपरिषदांसाठी सहायक अनुदान	१२००
१८	नगरपरिषदांना वैशिष्टयपूर्ण कामासांठी विशेष अनुदान	८००
१९	महानगरपालिका क्षेत्रात पायाभूत सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद	९५०
२०	हद्दवाढ झालेल्या मनपांना नव्याने समाविष्ट क्षेत्रात नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय	५०
२१	नगरपालिका/नगरपरिषदांना त्यांच्या नव्याने विस्तारलेल्या सीमाक्षेत्रामध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय	१००
२२	नव्याने स्थापन केलेल्या नगरपालिका/नगरपरिषदांना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय	५०
२३	नव्याने स्थापन नगरपंचायतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय	२००
२४	नगरपरिषद क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विकास कार्यक्रमासाठी सहायक अनुदान	१०
२५	तुळजापूर शहर विकास प्राधिकरणास सहाय	१
२६	जेएनएनयुआरएम/युआरडीएसएसएमटी अंतर्गत प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी मनपांना सहायक अनुदान	०.०००१
२७	जेएनएनयुआरएम/युआरडीएसएसएमटी अंतर्गत प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी नगरपरिषदांना सहायक अनुदान	०.०००१
२८	पैठण-आपेगांव शहर विकास प्राधिकरणास सहाय	६०
२९	पंढरपुर शहर विकास प्राधिकरणास सहाय	०.०००१
३०	राज्यातील नगरपरिषदांना अग्निशमन सेवा व आणिबाणीच्या सेवांच्या बळकटीकरणासाठी सहाय	२०
३१	राज्यातील महानगरपालिकांना अग्निशमन सेवा व आणिबाणीच्या सेवांच्या बळकटीकरणासाठी सहाय	१०
३२	जागतिक बँक व जागतिक पर्यावरण सुविधा या अंतर्गत कायमस्वरुपी नागरी परिवहन प्रकल्पाकरिता पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकांना कर्जे	०.०००१

अ.क्र.	योजनेचे नाव	अर्थसंकल्पित तरतूद (रु.कोटीत)
(१)	(२)	(३)
३३	राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (राज्य हिस्सा)	९२
३४	राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (केंद्र हिस्सा)	१२५
३५	राज्य नागरी उपजीविका अभियान	०.०००१
३६	सिंहस्थ कुंभमेळयाचे नियोजन व अंमलबजावणीवरील खर्चाकरिता सहायक अनुदान	०.०००१
३७	राज्यातील नगरपरिषदांना संगणकीकरणासाठी अनुदान	०.०००१
३८	जागतिक पर्यावरण सुविधा अंतर्गत कायमस्वरुपी नागरी परिवहन प्रकल्पाकरिता पुणे इ. पिंपरी-चिंचवड मनपा संनियंत्रण सहाय	०.०००१
३९	राज्यातील मनपांना संगणकीकरणासाठी अनुदान	१०
४०	पहिल्या राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील गिरीस्थान नगरपरिषदांना विशेष पर्यटन विकास अनुदान	१२
४१	मनपा क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विशेष कार्यक्रमासाठी सहायक अनुदान	१०
४२	शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण	१
४३	अभियांत्रिकी पदवीधरांना नगररचना या विषयातील प्रशिक्षण	११.३६
४४	बृहन्मुंबई पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प (ब्रिमस्टोवॅड) यासाठी सहाय	०.०००१
४५	राष्ट्रीय नागरी पद्धती अंतर्गत राज्याचे अंशदान	०.०००१
४६	ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी तरतूद	२.५०
४७	मुंबई नागरी परिवहन प्रकल्पासाठी अतिरिक्त केंद्रीय सहाय	७५
४८	पुणे मेट्रो प्रोजेक्ट	२०६.८
४९	नागपूर मेट्रो राज्य शासनाची भाग भांडवली गुंतवणुक	१२.५०
५०	नागपूर मेट्रो राज्य शासनाचे दुय्यम कर्ज	५०.२
५१	मुंबई मेट्रो लाईन-३	२४५.३०
५२	श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी विकास आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी नागपूर सुधार प्रन्यासला सहाय	०.०००१
५३	स्मारकाच्या बांधकामासाठी महानगरपालिकांना सहायक अनुदान	१०
५४	स्मारकाच्या बांधकामासाठी नगरपालिकांना सहायक अनुदान	२
५५	स्मारकाच्या बांधकामासाठी नगरपंचायतींना सहायक अनुदान	२
५६	तेजस्विनी महिला बस सेवा चालविण्यासाठी मनपांना अनुदाने	२०
५७	सॅटेलाईट शहरांसाठी पायाभूत सुविधा विकास योजनेंतर्गत महापालिकांना सहाय्य (केंद्र हिस्सा)	०.०००१
५८	सॅटेलाईट शहरांसाठी पायाभूत सुविधा विकास योजनेंतर्गत महापालिकांना सहाय्य (राज्य हिस्सा)	०.०००१